100 शताब्दी वर्ष
निर्भीड पत्रकारितेचे शताब्दी वर्ष

R.N.I.No.1814/57
एकमेव स्वतंत्र दैनिक
नवाकाळ
NAVAKAL
• मुंबई, गुरुवार ५ मे, २०२२ • वर्ष-१००, अंक-५९, पाने-८, किंमत : ₹ ५
• Issue - 59 Vol.- 100 Marathi - Daily - Mumbai, 5 May - 2022 Page- 8 Price- Rs. 5/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## २४ राज्यांत मुसळधार पावसाचा इशारा

**नवी दिल्ली**- सध्या उष्णतेची लाट येत आहे. कडक उन्हामुळे घरातून बाहेर न पडण्याचा इशाराही हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. असे असताना, हवामानात बदल झाल्यामुळे देशातील २४ राज्यांत मुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, आसाम आणि तामिळनाडू, लक्षद्वीप, केरळ, मेघालय, आसाम, अरुणाचल प्रदेश, पश्चिम उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, दिल्ली, कर्नाटक, बिहार, तेलंगणा, आंध्र प्रदेश, ओडिशा, छत्तीसगड, झारखंड या राज्यांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

# भोंगे उतरणार नाही तोपर्यंत आंदोलन सुरुच राहणार

■ मुंबई

**मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन पुन्हा इशारा दिला की, जोपर्यंत भोंगे उतरणार नाहीत तोपर्यंत आंदोलन सुरुच राहील. भोंगे वाजले की हनुमान चालिसा दुप्पट आवाजात म्हटली जाणारच!**



**राज ठाकरे** पुढे म्हणाले की, महाराष्ट्रातून आणि राज्याच्या बाहेरून अनेक फोन येत आहेत. आमच्या मनसैनिकांना पकडतायत, नोटीस पाठवत आहेत. आम्ही कायद्याचे पालन करीत आहोत तर आज ९० ते ९२ टक्के महाराष्ट्रात सकाळची अजान झाली नाही. त्या मौलवींचे आभार मानतो की, त्यांना हा विषय व्यवस्थित समजला. मुंबईत एकूण ११४० मशिदी आहेत त्यापैकी १३५ मशिदींवर पहाटे ६ वाजण्याआधी अजान लावली. या १३५ मशिदींवर कारवाई का होत नाही? लोकांना जो त्रास होतो तो बंद व्हावा यासाठी हा एकत्रित प्रयत्न आहे.

महाराष्ट्रातील बहुतांश मशिदी अनधिकृत आहेत आणि त्यावर लावलेल्या भोंग्यांना सरकार अधिकृत परवानगी देत आहे हा प्रकार मला कळत नाही. जर यापुढे अजान वाजला तर हनुमान चालिसा वाजवली जाणारच. सुप्रीम कोर्टाने जितक्या डेसिबलला परवानगी दिली आहे तितक्या डेसिबलमध्ये म्हणा. लोकवस्तीत ५५ डेसिबलपर्यंत परवानगी आहे. रोज डेसिबल मोजत कोण बसणार? तुम्हाला प्रार्थना करायची तर मशिदीत करा. त्यासाठी लाऊडस्पीकर कशाला हवा? त्यामुळे भोंगे उतरलेच पाहिजेत. जोपर्यंत भोंगे उतरत नाहीत तोपर्यंत आंदोलन सुरुच राहील. आज आवाज कमी झाला म्हणून आम्ही आनंदी नाही. ज्या मशिदीतील मौलवी ऐकणार नाहीत त्याबाहेर त्यांच्या दुप्पट आवाजात चालिसा म्हटली जाईल. ज्या १३५ मशिदींनी

» पान ७ वर

# दोन आठवड्यात सर्व निवडणुका जाहीर करा
## सर्वोच्च न्यायालयाचे आयोगाला निर्देश

**ओबीसी आरक्षणाच्या सुनावणीवेळी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत आज सर्वोच्च न्यायालयाने एक महत्वपूर्ण निर्णय दिला आहे. राज्यातील १८ महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका येत्या दोन आठवड्यात जाहीर करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाला सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. पावसाळ्यापूर्वी निवडणुका घेणे शक्य नसल्याचे राज्य सरकारचे कारण कोर्टाने फेटाळले आहे. निवडणूका घेण्याचा राज्याचा अधिकार आहे पण ज्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत त्यांच्या निवडणुका घ्याव्याच लागतील. प्रशासक ठेवून कारभार चालवता येणार नसल्याचे कोर्टाने म्हटले आहे. ओबीसीशिवाय निवडणुका नको हा सरकारचा निर्णयही कोर्टाने रद्दबादल ठरवला आहे. राज्यातील राजकीय वातवरण तापले असतानाच आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू होणार आहे.**



■ मुंबई

सध्या राज्यातील मुंबई, ठाणे, नवी मुंबई, नागपूर, कोल्हापूर,औरंगाबाद यासह एकूण १८ महानगरपालिकांची मुदत संपली आहे. या ठिकाणी राज्य सरकारने प्रशासक नेमले आहेत. आता पावसाळा जवळ असल्याने जून किंवा जुलै महिन्यामध्ये निवडणुका घेणे शक्य नसल्याचे प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात सरकारने दाखल केले होते. पण त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने आयोगाला आदेश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने निवडणुका घेण्याचे आदेश दिले तरी प्रभागरचना लागू करून निवडणूक घेण्यास जून जुलै उजाडेल. या काळात मान्सून प्रभावी असल्याने निवडणुका घेणे शक्य होणार नाही, असे आयोगाने सांगितले होते. पण हा युक्तिवाद फेटाळण्यात आला.

तत्पूर्वी, ओबीसींचे राजकीय आरक्षण रद्द

» पान ७ वर

# रिझर्व्ह बँकेने रेपो रेट वाढवला बँकांच्या कर्जाचे हप्ते महागणार

■ मुंबई

**रिझर्व्ह** बँक ऑफ इंडियाने आज बुधवारी प्रदीर्घ कालावधीनंतर अचानक रेपो दरात वाढ करण्याची घोषणा केली. आता रेपो दर एका झटक्यात ०.४० टक्क्यांनी वाढून ४.४० टक्के झाला आहे. त्यामुळे स्वस्त कर्जाचे युग आता संपले आहे. रिझर्व्ह बँकेच्या या घोषणेमुळे बँकांच्या कर्जाचे हप्ते महागणार आहेत. त्याचा परिणाम सर्वसामान्य जनतेवर होणार आहे.

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज बुधवारी अचानक पत्रकार परिषद घेतली. यावेळी दास म्हणाले की, २ मे आणि ४ मे रोजी झालेल्या रिझर्व्ह बँकेच्या बैठकीवर चर्चा झाली आणि त्यात ४० बेसिस पॉईंट्सने वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. बऱ्याच काळापासून रेपो दरात वाढ करण्यात आली नव्हती. याआधी रेपो दर ४ टक्के होता तो आता ४.४० टक्के होईल, असे दास म्हणाले. तसेच ही दरवाढ तात्काळ प्रभावाने लागू होणार आहे. मार्च २०२२ मध्ये किरकोळ महागाई झपाट्याने वाढली आणि ७ टक्क्यांवर पोहोचली.

### शेअर बाजार कोसळला

रिझर्व्ह बँकेने रेपो दरात ०.४० टक्क्यांनी वाढ केल्याची घोषणा केली आहे. रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयाचे पडसाद आज शेअर बाजारावरही उमटले. या निर्णयानंतर शेअर बाजार कोसळला. सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही निर्देशांकात मोठी घसरण झाली. सेन्सेक्समध्ये तब्बल १४०३.१३ टक्क्यांची म्हणजेच २.४६ टक्क्यांची घसरण झाली. तर निफ्टीमध्ये ४३९.७० म्हणजेच २.५८ अंकांची घसरण नोंदवली गेली.

# मनसुख हिरेनच्या हत्येचे प्रदीप शर्मा मुख्य सुत्रधार

■ मुंबई

**मनसुख** हिरेन हत्या प्रकरणाचा तपास करणाऱ्या राष्ट्रीय तपास पथकाने (एनआयए) आज मुंबई हायकोर्टात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. या प्रतिज्ञापत्रामध्ये एन्काऊंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा हे मनसुख हिरेनच्या हत्येचे मुख्य सुत्रधार असल्याचे म्हटले आहे. हायकोर्टात यावर १७ जुलै रोजी पुढील सुनावणी होणार आहे. प्रदीप शर्मा यांनी जामीन मिळावा यासाठी विशेष एनआयए कोर्टात अर्ज सादर केला होता. या अर्जाला प्रत्युत्तर करताना एनआयएने हायकोर्टात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. एनआयएने हायकोर्टाला सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, एन्काऊंटर स्पेशालिस्ट असलेले प्रदीप शर्मा हे मनसुख हिरेनच्या हत्येचे मुख्य सुत्रधार आहेत. मनसुख हिरेनच्या हत्येचा कथित कट मुंबई पोलीस आयुक्तांच्या इमारतीत रचण्यात आला होता. या ठिकाणी प्रदीप शर्मा आणि इतर आरोपींमध्ये अनेकदा बैठका पार पडल्या. एपीआय सचिन वाझेने मनसुख हिरेनची हत्या करण्यासाठी प्रदीप शर्मा यांना ४५ लाख रुपये दिले, असल्याचे एनआयएने म्हटलेय.

# साईंच्या आरतीचे भोंगे बंद करू नका शिर्डीतील मुस्लीम समाजाची मागणी

■ शिर्डी

**गेल्या** अनेक वर्षाच्या इतिहासात प्रथमच साईबाबा मंदिरातील रात्रीची व सकाळची आरती भोंग्यांविना झाली. यावर आता मुस्लीम समाजाने सकारात्मक पुढाकार घेत साईंच्या आरतीचे भोंगे बंद करु नका, अशी मागणी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे. धार्मिक स्थळावरील भोंग्यांवर सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर शिर्डीतील साईबाबा संस्थानने मंदिरात पहाटे होणारी काकड आरती आणि रात्रीच्या शेजारतीच्यावेळी मंदिरावरील स्पीकर न लावण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची अंमलबजावणीही सुरू झाली. भोंग्याचा हा वाद चालू असताना शिर्डीतील मुस्लीम समाजाने सकारात्मक पुढाकार घेतला आहे. जामा मशिद ट्रस्टचे अध्यक्ष शमशुद्दीन यांनी प्रशासनाला निवेदन देत पहाटेचा अजान लाऊडस्पीकरवर होणार नाही, पण साईंच्या काकड आणि शेजारतीचे भोंगे बंद करु नका, अशी मागणी केली आहे.

### राऊतांची राज ठाकरेंवर टीका

शिर्डीच्या मंदिरांवरील भोंगे बंद झाल्याच्या मुद्यावरून शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनी राज ठाकरे यांचे नाव न घेता त्यांच्यावर निशाणा साधला आहे.



संजय राऊत म्हणाले की, आंदोलनं फक्त प्रसिद्धीसाठी आणि चिथावणीसाठी नसतात. शिवसेना गेली ५० वर्षे आंदोलन करत आहे. काही लोक राजकारणात हवशे नवशे गवशे असतात, त्यांच्यासाठी हे ठीक आहे. ज्यांनी बाळासाहेबांना सोडले, ज्यांनी बाळासाहेबांचा विचार सोडला, पाठीत खंजीर खुपसणारे भाजपाचे उपवस्त्र म्हणून राहत आहेत, त्यांनी आम्हाला शिकवू नये.

# अखेर राणा दांपत्यांना सशर्त जामीन मंजूर



■ मुंबई

**राजद्रोह** आणि इतर गुन्ह्यांखाली अटकेत असलेल्या राणा दांपत्याला अखेर १२ दिवसांनी सत्र न्यायालयाने ५० हजारांच्या जात मुचलक्यावर सशर्त जामीन मंजूर केला आहे. दरम्यान एकीकडे त्यांची जामिनावर सुटका होत असतानाच, आता त्यांच्या खार येथील घरात अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी महापालिकेने त्यांच्यावर नोटीस बजावली आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री या निवासस्थानी हनुमान चालिसा पठण करण्याचा राणा दांपत्यांनी हट्ट धरला होता. त्यासाठी ते मुंबईत आले होते. त्यांच्या विरोधात शिवसैनिकांनी त्यांच्या खार येथील घरासमोर मोठे आंदोलन केले होते. मातोश्रीच्या बाहेरही शिवसैनिकांनी मोठी मोर्चेबांधणी करून राणा दांपत्याला धडा शिकवण्याचा इशारा देत होते. या सर्व पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी राणा दांपत्याच्या घरी जाऊन त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला तसेच त्यांना नोटीस बजावली. त्यामुळे २३ एप्रिल रोजी सायंकाळी राणा दांपत्याला अटक करण्यात आली आणि सुरुवातीला पोलीस कोठडी आणि नंतर १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली.

# २८ वर्षांच्या संन्यासानंतर मुख्यमंत्री योगी घरी गेले! आईचा आशीर्वाद घेतला

■ डेहराडून

**उत्तर प्रदेशचे** मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ २८ वर्षांच्या संन्यासानंतर प्रथमच उत्तराखंडच्या पाचूरमधील वडिलांच्या घरी गेले. त्यांनी आई सावित्री देवीचा आशीर्वाद घेतला. यावेळी ते ३ बहिणी आणि ३ भावांना भेटले. त्यानंतर त्यांनी प्रथमच वडिलांच्या घरी मुक्काम केला.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ ३ दिवसांच्या उत्तराखंड दौऱ्यावर आहेत. त्यात त्यांनी पाचूरपासून २ किलोमीटरवर



असलेल्या बिध्याणी येथील महायोगी गुरु गोरखनाथ शासकीय महाविद्यालयात गुरु वैद्यनाथ यांच्या प्रतिमेचे अनावरण केले. त्यानंतर यमकेश्वरमधील पाचूर गावातील घरी जाऊन ८५ वर्षांच्या आई सावित्री देवीचा आशीर्वाद घेतला. ३ बहिणी व ३ भावांना भेटले. यावेळी ते अतिशय भावुक झाले होते. आईचे चरणस्पर्श करून आशीर्वाद घेतानाचा फोटो त्यांनी ट्विटरवर व्हायरल केला आहे.

# गणेश नाईकांना दिलासा अटकपूर्व जामीन मंजूर



■ मुंबई

**महिलेकडून** बलात्कार आणि धमकी दिल्याचा आरोप करण्यात आल्यामुळे अडचणीत आलेले भाजपचे नेते गणेश नाईक यांनी पोलिसांच्या अटकेपासून वाचण्यासाठी हायकोर्टाकडे अटकपूर्व जामिनाचा अर्ज केला होता. अखेर मुंबई उच्च न्यायालयाने आज गणेश नाईक यांना २५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर अटकपूर्व जामीन मंजूर केला. या निर्णयामुळे गणेश नाईक यांना मोठा दिलासा मिळाला आहे. नाईक यांच्यासोबत 'लिव्ह इन रिलेशनशिप'मध्ये राहिलेल्या एका महिलेने त्यांच्याविरोधात बेलापूर आणि नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. नाईक यांच्यासोबत लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या एका महिलेने २७ वर्षांनी बलात्काराचा आरोप केला होता. याबाबत नेरूळ पोलीस ठाण्यात कलम ३७६ अन्वये गुन्हा दाखल झाला होता. तसेच रिव्हॉल्व्हर दाखवून धमकाविले प्रकरणी सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्यातही नाईक यांच्याविरुद्ध याच महिलेने स्वतंत्र गुन्हा दाखल केला होता. नवी मुंबईतील नेरूळ पोलिसांनी या प्रकरणात तपास करण्यास सुरुवात केली असून, या महिलेची वैद्यकीय चाचणी केली होती.

# देशात पाऊस पाणी मुबलक, मात्र आर्थिक अडचणी वाढणार! भेंडवळची भविष्यवाणी

■ बुलडाणा

**भेंडवळच्या** भविष्यवाणीकडे संपूर्ण राज्यातील शेतकऱ्याचे लक्ष लागलेले असते. चंद्रभान महाराज यांचे वंशज पुंजाजी महाराज आणि सारंगधर महाराज यांनी निरीक्षणे करून यंदाचा अंदाज जाहीर केला असून यावर्षी देशात सत्ता पालट होणार नाही, देशाचे संरक्षण चांगले राहील, परंतु देशात आर्थिक अडचणीत वाढतील तसेच वर्षभर मध्यम आणि अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता असून देशातील, राज्यातील रोगराईचा नायनाट होणार असल्याचे भाकीत करण्यात आले आहे.

भेंडवळ घटमांडणीनुसार, यंदा जून महिन्यात चांगला



पाऊस तर जुलै महिन्यात साधारण पाऊस असेल, तर ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात चांगला पाऊस पडणार आहे. तर यंदाही बळीराजाला अवकाळीचा सामना करावा लागणार आहे. तर गेल्या दोन वर्ष सामना करत असलेल्या कोरोनाचा यंदा मात्र नायनाट होण्याची शक्यता आहे. यंदा देशात रोगराई राहणार असा अंदाज भेंडवळच्या घटमांडणीतून वर्तवण्यात आला आहे.

# एलआयसीच्या आयपीओला उघडताच बंपर ओपनिंग

■ मुंबई

**एलआयसीचा** आयपीओ आज सकाळी उघडताच त्याला बंपर ओपनिंग मिळाली. देशातील सर्वात मोठा आयपीओ सकाळी १० वाजता सबस्क्रिप्शनसाठी उघडला गेला आणि फक्त दोन तासात ३६% सबस्क्राइब झाला. पॉलिसीधारकांसाठी राखीव असलेला भाग (एकूण शिल्लक १०%) ओव्हरसबस्क्राइब झाला आहे. याचा अर्थ या कोट्याअंतर्गत १.२० पट बोली लावण्यात आली आहे. १६ कोटी २० लाख ७८ हजार ६७ शेअर्स विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. आजपर्यंत ५ कोटींहून अधिक शेअर्ससाठी निविदा प्राप्त झाल्या आहेत. कर्मचाऱ्यांसाठी राखीव वाटा ६४% आणि किरकोळ गुंतवणूकदारांनी ३९% सदस्यत्व घेतले आहे. गुंतवणूकदारांना ९ मे पर्यंत गुंतवणूक करण्याची संधी मिळेल. कंपनीचे शेअर्स १७ मे रोजी बंद झाल्यानंतर एका आठवड्यानंतर स्टॉक एक्सचेंजमध्ये सूचीबद्ध केले जातील. एलआयसीच्या आयपीओ मधून केंद्र सरकारला २१,००० कोटी रुपये मिळण्याची अपेक्षा आहे. आयपीओ अंतर्गत सरकार कंपनीतील २२.१३ कोटी शेअर्स विकत आहे.

# वरवरा राव यांची याचिका हायकोर्टाने फेटाळली

■ मुंबई

**हायकोर्टाने** भीमा कोरेगाव प्रकरणातील संशयित आरोपी वरवरा राव यांची याचिका फेटाळली. वरावरा राव यांच्यासह अरुण फरेरा आणि वर्नोन गोन्सालविस याच्याकडून न्यायालयाने डिसेंबर २०२१ मध्ये देण्यात आलेल्या निर्णयाबाबत पुनर्विचार याचिका दाखल केली होती. तिघांच्याही जामिनास कोर्टाने नकार दिला आहे. न्यायमूर्ती एस.एस शिंदे आणि न्यायमूर्ती एन. जे जमादार यांच्या खंडपीठाने २०२१ मध्ये कोर्टाने दिलेल्या निर्णयामध्ये कोणत्याही तथ्यात्मक त्रुटी नसल्याचे म्हटले आहे. हायकोर्टाने मागील वर्षी आठ आरोपींना जामीन देण्यासाठी नकार दिला होता. तर सहआरोपी सुधा भारद्वाज यांना हायकोर्टाकडून जामीन मंजूर करण्यात आला होता.आर. सत्यनारायण यांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या याचिकेत वरवरा राव, फरेरा आणि गोन्सालविस यांच्याबाबत दिलेल्या २०२१ च्या निर्णयात कथित त्रुटी सुधारण्याची मागणी केली होती.

मुतखडयावर यशस्वी उपचार !
मुतखडा, किडनी फेल्युअर, प्रोस्टेटची वाढ होणे, लघवी साफ न होणे व कंट्रोल न होणे, पितखडा
या सारख्या आजारांवर डॉ. जी. बी. बिराजदार यांचा विना ऑपरेशन, विना वेदनारहित, कायमस्वरुपी अत्याधुनिक उपचार करा आजारांवर डॉ. जी. बी. बिराजदार यांनी यशस्वी संशोधन करुन हजारो रुग्णांस रोगमुक्त केले आहेत.
मुतखडा दोन ते तीन दिवसांच्या उपचाराने लघवीद्वारे निघून जातो.
दिनांक 07/05/2022 रोजी सकाळी 10 ते दुपारी 1 वाजेपर्यंत, बोरवणकर पॉलिक्लिनिक, गोखले रोड, स्टेशनजवळ, ठाणे (प). तरी गरजू रुग्णांनी खालील फोन नंबर वर नाव नोंदणी करावी.
• तपासणी फि रु. 500/- • औषध खर्च रु. 5000/-
रुग्ण नाव नोंदणी 9860961553 / 9930153354

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
मोबा.८१०८११६४२३

## पाहिजेत

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर/जापाबाई/कुकिंगसाठी पासपोर्ट (असणारी / नसणारी) बायका / मुली पाहिजेत. (पगार 18,000-40,000) ''रंजितसर'' **9321417007 / 9892575886** दादर स्टेशनसमोर {NCC220336}

सिक्युरिटी गार्डसाठी मुले / मुली पाहिजे 8 तास 14000 / 12 तास 18000. राहण्याची / जेवण्याची सुविधा. **9892942803** {NC220243}

घरबसल्या चॉक (खडू) पॅकिंग काम हप्ता 10000 कमवा मो.- **8425896515** {NCC220326}

संगी पेस्ट कंट्रोलसाठी घाटकोपर स्टेशनजवळ टेक्निशियनची गरज आहे. संपर्क - **9324138037** {NC220348}

अंधेरी पूर्वमधील प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला रिकव्हरी आणि कलेक्शनच्या कामासाठी इलेक्ट्रिशियन (२०) आणि सुपरवायझर (५) पाहिजेत. अनुभवींना प्राधान्य. SSC/ ITI/PWD. **7208993035 / 7208993036** {NCC220351}

गारमेंट मेडिसीन कंपनीला अर्जंट पॅकिंग, हेल्पर, हाऊसकिपिंग, सिक्युरिटी, ऑफिशियल इलेक्ट्रीशियन मुला, मुलींची परमनंट भर्ती **8291353332** {NCC220348}

एच डी एफ सी बँकेत मुले मुलींची डायरेक्ट भरती 18000 - 45000 **(7304612304)** {NC220350

स्ट्रिक्ट सिक्युरिटी आणि हाऊसकिपिंग कंपनीला ऑपरेशन मॅनेजर/एरिया मॅनेजर/ फिल्ड ऑफिसर/ सीसीटीव्ही ऑपरेटर/ सेल्स मॅनेजर/ टेलीकॉलर/ सिक्युरिटी गार्ड/ सुपरवायझर/ बाऊंसर/ पेन्टरी बॉय/ हाऊसकिपिंग मुले/ मुली पाहिजेत - **7208004614 / 13/ 03/ 9920063236/ 35.** {NCC220316}

असिन पॉवर प्रा.लि. ठाणे (इलेक्ट्रिकल बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टींग) कंपनीला अनुभवी उमेदवार पाहिजेत. इलेक्ट्रिकलः प्रोजेक्ट : प्लॅनिंग इंजिनियर, (फ्रेशर/ सिनियर) सुपरवायजर, सेफ्टी ऑफीसर, लेबर कॉन्ट्रॅक्टर संपर्क - **8108105161/ 8425816604** {NC220390}

सिक्युरिटी/सुपरवायजर भर्ती पगार 18300 ते 24500 हजार. मो **8976202588** {NCC220034}

वृद्धाश्रममध्ये कामासाठी पुरुष/महिला पाहिजेत. राहणे-खाणे फ्री, पगार 6000-8000. मीरारोड/ऐरोली/ केळवेरोड- **8779694066** {NC220084}

घरकामासाठी महिला - मुली - मुले जोडपे HOTEL STAFF - पेशंटकेअर - गव्हर्नेस (राहणे-खाणे) **8976034958 / 8976034959** (GOREGAON वेस्ट) {NC220359}

मुंबईमध्ये 12/24 तास आया, नर्स, वॉर्डबॉय, बेबीकेअर, हाऊसमेड पाहिजेत. पगार (15,000-36,000) **9820628009 / 9833470117** {NCC220404}

घरकामासाठी महिला/मुली/मुले. (भरपूर पगार) (राहण्या-खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC220387}

24 तास आश्रममध्ये राहून काम करण्यासाठी आया आणि वॉडबॉयची जागा आहे. **8379998437** {NCC22013}

प्रतिक्षानगरसाठी सिक्युरिटी गार्डस पाहिजेत. 8 तासाकरीता पगार 9500/- रुपेश - **9920919824 / 9820206078** {NC220401}

इमिटेशन ज्वेलरीमध्ये स्टोन सेटिंग आणि कडी फिटिंग करण्यासाठी मुली पाहिजे. दहिसर (पूर्व) - मोबाईल नं. - **8169999128** 12 ते 2 या वेळेत संपर्क करा. {NCC220347}

ड्रायव्हर पाहिजे १२ तास ड्युटी १५०००/- पगार बाहेर गेल्यास जेवण मिळेल. गोरेगाव **7977139140** {NCC220443}

बेबी केअर सेंटरसाठी पाच ते सहा वर्षांचा अनुभव असलेली एक महिला आया पाहिजेत. पगार रु. 21311/- आणि एक पर्यवेक्षक/ व्यवस्थापक महिला, ग्रेज्युएट, दोन ते तीन वर्षांचा अनुभव, एचआर व्यवस्थापनाचे प्रशिक्षण. ९:३० तासांच्या ड्युटी. पगार रु. 28154/. हिंदी आणि मराठीचे ज्ञान. मानखुर्द येथे पोस्टिंग. बायोडेटा पाठवा mumbai.info@vpf.co.in. संपर्क - **9136724585** {NC220399}

पाहिजेत मल्टी टास्क सर्व्हिसेस लिपिक मूलभूत संगणक ज्ञान, ग्रेज्युएट, हिंदी, इंग्रजी आणि मराठी भाषेतील मौखिक आणि लेखनाचे ज्ञान. 8 तास ड्युटी. पगार रु. 24206/- मलबार हिल येथे पोस्टिंग. बायोडेटा पाठवा mumbai.info@vpf.co.in. संपर्क - **9136724585** {NC220440}

## पाहिजेत

वृद्धाश्रमात कामासाठी आया/मावशी आणि वॉर्डबॉय पाहिजेत. राहण्याखाण्याची सोय. आकर्षक पगार भिवंडी - ठाणेकरिता. **9175178986 / 9688396887** {NC220313}

माहीम सितलादेवीला ''डेंटल क्लिनिकसाठी'' डॉक्टरना महिला डेंटल असिस्टंट सकाळी 10.30 ते 12.30 व संध्याकाळी 5.00 ते 9.30 ''जवळपास राहाणाऱ्यास प्राधान्य''- **"9820101208"** {NC220330}

IT कंपनीसाठी मुंबई (मस्जिद बंदर) येथे Telecaller ची आवश्यकता आहे. पदवीधर 12 वी पास, अनुभवी, फ्रेशर्स अर्ज करू शकतात, पगार 8000 संपर्क **8928623374** {NC220419}

इलेक्ट्रीकल कंपनीला अनुभवी वायरमेन आणि हेल्पर पाहिजेत. बोरीवली **8291286227 / 8452810043** {NC220431}

DIRECT ज्वानिंग सिक्युरीटीगार्ड, सुपरवायझर बॅक ऑफिससाठी मुले-मुली पाहिजेत. कमवा 18700-35000 राहणे फ्री शिक्षा नाही मालाड (वेस्ट) **9082791506** {NCC220428}

### पाहिजेत

सिक्युरीटी गार्ड / सुपरवायझर्स
— (ड्युटी ८/१२ तास) —
पगार १४०००/- ते १९०००/- च्या पुढे S.G. / S.S.
P.F. E.S.I.C. सुविधेसह
ओरीजनल कागदपत्रांसहित ६००/- रू. युनिफॉर्मसाठी आणणे
दादर, भायखळा, लोअर परेल
**अलर्ट सिक्युरीटी**
ऑफिस नं. ५, पहिला मजला, राऊत इंडस्ट्रिअल प्रिमायसेस, इंडिअन ऑईल पेट्रोल पंपा शेजारी, सेनापती बापट मार्ग, माहिम (वेस्ट)
**9223334957/65/50/56/55**
**9967763221**

पेस्टकंट्रोल कंपनीकरिता टेक्निशिअन, टेलिकॉलर सेल्स एक्झिक्युटिव्ह पाहिजे. **7208091124 / 9820899502** {NC220388}

टेलिकॉलर पाहिजे (दहिसर) संपर्क - **8828647962** {NC220430}

गणेशमुद्रा मित्सुबिशी 4 कलर प्रिंटिंग मशिनसाठी किमान 5 वर्षे अनुभवी कॉम्प्युटर नॉलेज असणारा प्रिंटर, फिडरमॅन आणि सुपरवायझर प्रिंटिंग डिप्लोमा होल्डर व मार्केटिंगसाठी अनुभवी पाहिजेत. पत्ता - गाळा नं. 18, बिल्डिंग D-8, भुमी इंडस्ट्रीज, कल्याण बायपास जवळ, ठाणे नाशिक हायवेवर Email - sanjay@ganeshmudra.net {NCC220430}

5 स्टार हॉटेलमध्ये मोरी कामासाठी / लॉंड्री /हाऊसकिपींग अनुभवी मुले पाहिजेत राहणे व खाणे सोय - **9920998489** {NC220435}

दुकान कामासाठी मुलगा पाहिजेत. वय सीमा 30 वर्ष. पगार 12000/- ते 15000/- महोत्सव - महावीर डेकोरेटर्सच्या समोर, महाराणा प्रताप रोड, भाईंदर (वेस्ट) - **9324592346 / 9323592346.** {NCC220433}

ऑफीस स्टाफ / बॅक ऑफीस / डेटा एंट्रीसाठी 10 वी ग्रॅज्युएट M/F पगार 12000 - 25000 (Age-35) **8591584740** {NC220345}

काशिमीरा प्रिंटिंग प्रेसमध्ये कटिंग मशिनसाठी बाईंडर पाहिजे. संपर्क - भास्करभाई - **9321598918** {NCC220371}

अंधेरी साकीनाका येथे खाकरा मशीन ऑपरेटर, मॅन्युफॅक्चरिंग आणि पॅकिंग कामासाठी मुले/मुली पाहिजेत. वय -१८ ते ३५. संपर्क - **8850750522** {NCC220405}

मुंबईमध्ये बेबी केअर, पेशंट केअर, घरकामासाठी मुली, बाई पाहिजेत राहणे खाणे फ्री पगार १५ ते १८ हजार फो: **9819451714 / 9326459181** {NCC220072}

पॅकिंगसाठी मुले/मुली/महिला पाहिजेत. पगार घणसोली - 10865 / रबाळे - 11325 / तुर्भे - 12764 / महापे - 12764 / अंबरनाथ - 12764 - आसनगाव 13950/- संपर्क - **9819182176 / 9769575757** {NCC220263}

BKC येथे पार्टटाईम हेल्पर पाहिजे. पगार 7000/- फोन - **7977596442.** {NC220391}

सिक्युरिटी गार्ड पाहिजेत पगार 18500 कल्याण, ठाणे, दादर **8976232947** {NCC220444}

ठाणे कोल्हापुरी हॉटेलसाठी किचन हेल्पर, वेटर कॅप्टन हवेत. **9869026771, 9136745671** {NCC220445}

गोरेगाव पूर्वमध्ये डिलीव्हरीबॉईज पाहिजेत. पगार रोज ६००/- ड्युटी सकाळी ८ ते संध्याकाळी ४. **8007527833** {NCC220441}

त्वरित ज्वॉईनिंग सिक्युरिटी, पॅकींग, हाऊसकिपींग, पेशंटकेअर, ड्रायव्हर, ऑफिसबॉय, **7400018840** {NCC220442}

## पाहिजेत

ऑफीस कामासाठी कॉम्प्युटरचे बेसीक/डी.टी.पी. ज्ञान असणारी मुली/बाई पाहिजे. 4 व्हिलर गाडीसाठी ड्रायव्हर मुलगा/पुरुष पाहिजे. अनुभव आवश्यक / सफाईसाठी मुले/मुली पाहिजे. फोटो अर्जासहित सकाळी ११ ते ६. श्री महाकाली चित्र, मुंबई, ३/१२ अनाजी मास्तर सोसायटी, खेडगल्ली, काकासाहेब गाडगीळ मार्ग, आशिष इंडस्ट्रीजच्या पाठीमागे, प्रभादेवी, मुंबई - २५. {NC220418}

अंधेरी पूर्वमध्ये हेल्पर्स पाहिजेत. रोज पगार ४००/- संपर्क- **9619291288** {NCC220440}

मुरबाड येथील कोरुगेटेड बॉक्स कारखान्यासाठी पिनींग ऑपरेटर पाहिजेत. संपर्कः **8652231498/ 9820235604** {NC222085}

ठाणे मधील आऊटलेटसाठी कॅशिअर पाहिजे. संपर्क- **9821060691** {NCC220438}

अंधेरीमधील लॉजिस्टीक कंपनीला बोलेरो पिकअपसाठी ड्रायव्हर व डिलीव्हरीबॉय पाहिजे. अंधेरीमधील राहणाऱ्यांना प्राधान्य. संपर्क करा- मॅक्स कुरीयर अ‍ॅन्ड कार्गो, गाळा नं.- २८, मखारीया इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, पेपरबॉक्सजवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई 400093. फोन- **9320101188** {NCC220437}

केक, बिस्कीट पॅकींगसाठी मुले/मुली पाहिजेत. पगार 17000-24000. **8108906113** {NC222086}

समोसा भजी बनविण्यासाठी कारागीर १५ हजार, हेल्पर ११,००० दुपारचे जेवण हॉटेल मधील १० ते ८.३० रविवार बंद गिरगांव **8691818303/ 8104961947** {NCC220436}

## Situation Vacant

Wanted Female Chartered Accountant , Assistant & Female Doctor For MAHILA MANDAL (PERMANENT) - **9405384055** {NCC220358}

Required Experienced Male and good knowledge for PCB Soldering at Dahisar Contact: Gaurav Kothari **9987267771** {NCC220439}

## Education

DO DIRECT SSC, HSC, BA, BCOM, BSC, MBA, DIPLOMA **9168088740** {NCC220403}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७ वी नापास? डायरेक्ट १०वी. ११ वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC220244}

## गुंतवणूक विषयक

लघु उद्योग (गारमेंट) मध्ये ५०,००० गुंतवणूक करून रोज २५०/- (१२ महिने) मिळवा (कमीत कमी गुंतवणूक १०,०००/-) **9892073272** {NCC220431}

## प्रॉपर्टीविषयक

डोंबिवली चाळीमध्ये 300 sq.ft रुम फक्त 6,25,000/- मध्ये बुकिंग रक्कम 21,000/- संपर्क - **9869318155 / 9619470001** {NC220402}

## व्यवसायविषयक

नोकरी शोधण्यापेक्षा स्वतःचा व्यवसाय सुरू करून दिवसा २०००/- पर्यंत ऑर्डर मिळवा. अनिरुद्धा, दादर **8652643434** {NCC220389}

श्री कँडल्स घरबसल्या रोज 2400 कमवा साचा फ्री नो टार्गेट **7777009017** {NC211818}

''माऊली'' मेणबत्या घरबसल्या २४०० रोज कमवा. साचा फ्री त्वरित पेमेंट- **8291062143** {NCC220001}

## कर्ज विषयक

कमी कागदपत्रे, कमी व्याजाने, कमी पगारावर पर्सनल लोन, बिझनेस लोन एक/दोन दिवसात उपलब्ध **8856879219** {NCC220366}

सर्व प्रकारचे कर्ज त्वरित उपलब्ध - Z Creation **9930825017** {NCC20429}

## जागा विषयक

डोंबिवलीमध्ये मिळवा आपले हक्काचे घर तेही 1BHK फक्त 4,00,000/- मध्ये संपर्क - **7208303835** {NC220367}

कल्याण पूर्व चाळीमध्ये रुम उपलब्ध 1 RK 3,00,000/- 1, BHK 4,00,000/- संपर्क **9152321845** {NC220369}

## फिल्मविषयक

मराठी टेलिफिल्मसाठी नवीन हौशी कलाकार पाहिजेत. संपर्क - डायरेक्टर - **9820202577** {NCC220214}

### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

-मॅनेजर, नवाकाळ'

# जुडोचे संस्थापक जिगोरो कानो





**जुडोचे** संस्थापक जिगोरो कानो यांचा जन्म.२८ ऑक्टोबर १८६० रोजीचा. जपानच्या मिकागे येथे. कानो जिगरो यांना फादर ऑफ ज्युडो (Father of Judo) नावानेही ओळखले जाते. जुडोची सुरवात १८८२ साली डॉ. जिगोरो कानो यांनी केली होती. एके काळी मार्शल आर्ट हा मारामारीचा खेळ म्हणून ओळखला जात असे. कानो जिगोरो यांनी या खेळाला न्याय, सौजन्य, सुरक्षा आणि नम्रता आदी गोष्टींसाठी नागरिकांना एकत्र आणणारा खेळ म्हणू औपचारीक मान्यता मिळवून दिली.

जिगोरो कानो यांचा जन्म एका संपन्न परिवारात झाला होता. त्यांचे आजोबा जपान मध्ये यशस्वी मद्य निर्माता होते. त्यांचे वडील एक पुजारी होते परंतु लग्नानंतर ते सरकारी अधिकारी बनले. जिगोरो कानो यांना लहानपणापासूनच चांगले शिक्षण मिळाले. वयाच्या सातव्या वर्षापासून त्यांना इंग्रजी, जपानी लिपी शिकवण्यात आली होती. चौदा वर्षाचे असताना कानो यांनी टोकियो मधील इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात प्रवेश घेतला. कानो उंची व वजनाने कमी होते. यामुळे बऱ्याच वेळा शाळेतील दांडगट मुले त्यांना त्रास देत असत. म्हणून त्यांनी जुजुत्सु शिकवणारे कोणी भेटते का याचा शोध घेतला पण त्यात त्यांना फारसे यश आले नाही कारण तेव्हा पाश्चिमात्यांच्या वाढत्या प्रभावामुळे ही कला नाहीशी होण्याच्या मार्गावर होती. लोकांच्या जुजुत्सु बाबतच्या अनासक्तयेमुळे ही कला शिकवणाऱ्या बऱ्याच लोकांना नोकरी गमवावी लागली होती अथवा त्यांचा ह्यावरचा विश्वास उडाला होता. कानो यांना अनेक माणसे भेटली ज्यांना ही कला ज्ञात होती पण त्यांनी शिकवण्यास मात्र नकार दिला. बराव शोध घेतल्यानंतर त्यांना फुकुडा नावाचे शिक्षक भेटले ज्यांनी त्याला शिक्षण दिले. त्यानंतर त्यांनी इसो मासातोमो व आयकुबो सुनेतोशी यांच्याद्वारे शिक्षण मिळवले. पुढे जाऊन त्यांनी शिकलेल्या अनेक कलांचे मिश्रण करून जुडो ह्या शाखेची सुरवात केली. पुढे जुडो ही कला शारीरिक, मानसिक आणि नैतिक अध्यापनासाठी जपानमध्ये उदयास आली.जुडोला आता एका खेळांचे स्वरूप प्राप्त झाले असले तरीही त्याची सुरवात आत्मरक्षा करण्यासाठी एक उपाय म्हणून झाल होती. जुडोच्या प्रसिद्धीचे एक कारण हे आहे की यासाठी वयाचे बंधन नसते. तुम्ही कोणत्याही वयात जुडो शिकू शकतात आणि तुम्ही जुडोमध्ये पारंगत झाल्यानंतर आपल्या पेक्षा दुप्पट आकाराच्या व्यक्तीला देखील सहज हरवू शकता. जुडोचा सराव करणाऱ्या व्यक्तीला जुडोका' म्हणतात. गेल्या वर्षी गुगलने जिगोरो कानो यांच्या जन्मदिना निमित्त त्यांचे डूडल बनवले होते. जिगोरो कानो यांचे निधन ४ मे १९३८ रोजी झाले.


संजीव वेलणकर, पुणे

# नाशिकच्या घोटीत भोंग्यांचा आवाज मशिदीच्या आतच

■ नाशिक

**इगतपुरी** तालुक्यातील घोटी शहरात महाराष्ट्र नवनिर्माण सेना, घोटी पोलीस व दोनही मशिद ट्रस्टच्या वतीने मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांच्या आवाहनाला उत्स्फुर्तपणे प्रतिसाद देत समन्वयाने पहाटेच्या अजानाचा आवाज कमी करण्यात आला. उर्वरित अजान देतांना प्रार्थना स्थळाच्या आत भोंग्यांचा आवाज ठेवणार असल्याची घोषणा करण्यात आली.

देशभरात अनेक जातीयवादी दंगे यापूर्वी झाले. मात्र घोटी शहराने कायम हिंदू-मुस्लिम एकतेचा संदेश देण्याचे महत्वपूर्ण काम केले आहे. मनसेचे उपजिल्हाध्यक्ष संदीप किर्वे यांच्या नेतृत्वाखाली यावेळी मनसेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी घोटी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप खेडकर, जामा मजिदचे ट्रस्टी डॉ. युनूस रंगरेज, शाही मजिदचे ट्रस्टी मुस्ताक पानसरे यांसह मुस्लिम बांधव उपस्थित होते.









# राशी भविष्य

संजय मनोहर

गुरुवार, दि. ५ मे २०२२

**मेष :** नातेवाईक, भावाबहिणींचे सहकार्य लाभेल. व्यावसायिक अडचणींना व्यक्तिगत संबंधातून उत्तर सापडेल. जवळील प्रवास सुखसमाधान वाढविणारे ठरतील.

**वृषभ :** अहंकारी वृत्तीने वागणे अडचणीचे ठरेल. मित्र, स्नेह्यांचे प्रश्न मार्गी लावू शकाल. कला, प्रसिद्धीच्या क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या उत्पन्नात भर पडेल.

**मिथुन :** व्यवसायात उत्तम अर्थप्राप्ती संभवते. पैशाची सर्कस थोडी मनाचा क्लेश वाढवू शकते. वैद्यकीय खर्च वाढणार नाहीत, याची काळजी घ्यावी.

**कर्क :** काहींना अचानक धनलाभाचे योग. संततीसंदर्भात वाटणारी काळजी खोटी ठरेल. स्वजनांबरोबर मनोरंजनाचा आनंद घ्याल.

**सिंह :** वरिष्ठ कनिष्ठांच्या वागण्यामुळे नोकरीत अडचणी भासू शकतात. मनातील अपेक्षा संततीकडून पूर्ण होतील. गोष्टी चुकून विसरणार, हरवणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

**कन्या :** खर्चास पैशाची उपलब्धता राहील. घरातील ज्येष्ठांच्या न ऐकण्याच्या वृत्तीमुळे ताणतणाव वाढेल. नोकरीत वरिष्ठ, कनिष्ठांची मनात नसूनही कामे करावी लागतील.

**तूळ :** पैशाच्या अडचणीबाबतीत मित्र योग्य सहकार्य करतील. नोकरदारांनी आश्वासनांवर अवलंबून राहू नये. कर्जप्रकरणे पूर्णत्वास जातील.

**वृश्चिक :** व्यवसायात तात्पुरत्या भांडवलासाठीचे प्रयत्न यश देतील. नातेवाईकांच्या आश्वासनावर कोणास आश्वासन देणे टाळावे. प्रवास कार्यसाधक ठरतील.

**धनु :** मित्रमंडळींचे सल्ले काही प्रमाणात फायदेशीर ठरतील. बांधलेले अंदाज, केलेल्या अपेक्षा संपूर्णपणे सफल होतील, असे नाही. वाहने जपून चालवावीत.

**मकर :** काहींना कमी श्रमात अधिक लाभ संभवतात. शेजाऱ्यांशी थोडे अंतर ठेवून असावे. कायदेविषयक अडचणीचे प्रश्न मार्गी लागतील.

**कुंभ :** मध्यस्थीचे काम करणाऱ्यांना उत्तम पैसा मिळेल. तरुणांना नवीन संधी प्राप्त होईल. प्रवासात चुकीची माहिती त्रासदायक ठरू शकते.

**मीन :** प्रसंगी स्वत:च्या बोलण्यावर ताबा ठेवणे किंवा मौन बाळगणे आवश्यक आहे. अनुभवी व्यक्तींच्या अनुभवाचा फायदा होईल. संघर्षाशिवाय यश मिळणार नाही.

### शुभ राशी दि. ०५/०५/२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | ६ | ४ |
| १० | ६० | ४० |
| १५ | ६५ | ४५ |
| १४६ | १२३ | १५८ |
| २३६ | १५० | १६७ |

## निकाल — गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी (महाराष्ट्र राज्य लॉटरी) — सोडत संध्या. 5:00

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 18 • तिकीट किं. रु.10/- • सोडत दिनांक 04/05/2022

पहिले बक्षिस रु. 10000/- : **MG-05 : 1748**

सर्व मालिकांसाठी • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | जिंकले | बक्षिस |
|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2798 — रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली: भारत ब्रधर्स - नागपूर (5 बक्षिसे) |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 6411 — रु 2000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 2000 ची 5 बक्षिसे जिंकली: श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई (5 बक्षिसे) |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1988 — रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली: श्री गुरुदेव दत्त लॉटरी एजन्सी - पुणे (5 बक्षिसे) |

पाचवे बक्षिस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2125 | 2290 | 3059 | 3996 | 4741 | 5549 | 6391 |
| | | 2173 | 2323 | 3233 | 4065 | 4867 | 5739 | 6396 |
| | | 2182 | 2349 | 3315 | 4179 | 4899 | 5834 | 6489 |
| | 1334 | 2196 | 2724 | 3420 | 4314 | 4994 | 5875 | 6608 |
| 1077 | 1829 | 2202 | 2767 | 3653 | 4458 | 5156 | 6072 | 6613 |
| 1144 | 1931 | 2216 | 2991 | 3817 | 4479 | 5195 | 6094 | 6699 |
| 1153 | 1944 | 2229 | 3028 | 3899 | 4499 | 5200 | 6130 | 6802 |
| 1204 | 1980 | 2266 | 3047 | 3933 | 4643 | 5546 | 6266 | 6966 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## अक्षय विकली लॉटरी (महाराष्ट्र राज्य लॉटरी)

सोडत दर बुधवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 18 • सोडत दिनांक 04/05/2022

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख : **AK-03 : 4476**

उत्तेजनार्थ बक्षिस रु. 5000/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी: 4476 — डायमंड कॉर्पोरेशन - बोरिवली, महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1855 | 2752 | 3273 | 4346 | 4579 | 5399 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1344 | 1453 | 4614 | 5644 | 5938 | 6861 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 2346 | 2511 | 5140 | 5836 | 5865 | 6592 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 2860 | 2888 | 4805 | 5725 | 6157 | 6894 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1862 | 2346 | 2961 | 3349 | 3820 | 4170 | 4459 | 4796 | 5283 | 5710 | 6173 | 6640 |
| | | 1882 | 2350 | 2972 | 3361 | 3821 | 4171 | 4463 | 4831 | 5290 | 5726 | 6176 | 6648 |
| 1002 | 1317 | 1891 | 2352 | 2975 | 3363 | 3833 | 4179 | 4467 | 4842 | 5295 | 5756 | 6188 | 6658 |
| 1011 | 1327 | 1899 | 2362 | 3008 | 3374 | 3841 | 4184 | 4468 | 4847 | 5306 | 5788 | 6196 | 6661 |
| 1052 | 1328 | 1914 | 2391 | 3009 | 3376 | 3880 | 4192 | 4471 | 4849 | 5347 | 5792 | 6223 | 6663 |
| 1057 | 1426 | 1919 | 2400 | 3024 | 3380 | 3893 | 4212 | 4477 | 4867 | 5360 | 5805 | 6227 | 6664 |
| 1058 | 1443 | 1921 | 2408 | 3036 | 3384 | 3895 | 4216 | 4500 | 4870 | 5362 | 5809 | 6246 | 6666 |
| 1064 | 1460 | 1923 | 2435 | 3053 | 3389 | 3906 | 4218 | 4514 | 4884 | 5430 | 5835 | 6258 | 6673 |
| 1071 | 1481 | 1944 | 2452 | 3070 | 3393 | 3924 | 4224 | 4522 | 4888 | 5455 | 5852 | 6282 | 6685 |
| 1096 | 1491 | 1951 | 2454 | 3083 | 3397 | 3936 | 4239 | 4526 | 4889 | 5483 | 5858 | 6289 | 6691 |
| 1104 | 1515 | 1962 | 2511 | 3085 | 3431 | 3953 | 4250 | 4534 | 4895 | 5485 | 5861 | 6290 | 6697 |
| 1105 | 1517 | 1963 | 2523 | 3098 | 3468 | 3961 | 4266 | 4540 | 4946 | 5492 | 5865 | 6294 | 6706 |
| 1111 | 1566 | 1984 | 2540 | 3102 | 3489 | 3963 | 4274 | 4564 | 4962 | 5504 | 5867 | 6296 | 6740 |
| 1117 | 1575 | 1986 | 2658 | 3129 | 3493 | 3979 | 4294 | 4574 | 4974 | 5507 | 5870 | 6306 | 6760 |
| 1125 | 1608 | 1995 | 2666 | 3134 | 3498 | 3983 | 4317 | 4591 | 5001 | 5525 | 5895 | 6343 | 6762 |
| 1136 | 1620 | 1999 | 2699 | 3159 | 3504 | 3996 | 4353 | 4606 | 5050 | 5531 | 5905 | 6362 | 6766 |
| 1137 | 1646 | 2002 | 2729 | 3179 | 3547 | 4003 | 4354 | 4615 | 5056 | 5536 | 5945 | 6365 | 6768 |
| 1157 | 1648 | 2008 | 2757 | 3191 | 3553 | 4004 | 4356 | 4624 | 5059 | 5537 | 5954 | 6369 | 6769 |
| 1161 | 1687 | 2012 | 2787 | 3195 | 3573 | 4012 | 4357 | 4637 | 5090 | 5540 | 5956 | 6377 | 6796 |
| 1170 | 1714 | 2020 | 2792 | 3220 | 3579 | 4013 | 4360 | 4642 | 5097 | 5546 | 5959 | 6387 | 6799 |
| 1173 | 1718 | 2052 | 2798 | 3225 | 3590 | 4014 | 4364 | 4643 | 5099 | 5549 | 5979 | 6392 | 6817 |
| 1176 | 1724 | 2060 | 2801 | 3235 | 3593 | 4019 | 4365 | 4646 | 5100 | 5551 | 5989 | 6396 | 6847 |
| 1180 | 1746 | 2092 | 2809 | 3255 | 3604 | 4021 | 4370 | 4659 | 5139 | 5554 | 5995 | 6468 | 6853 |
| 1181 | 1748 | 2128 | 2822 | 3293 | 3633 | 4024 | 4381 | 4665 | 5147 | 5557 | 6002 | 6469 | 6855 |
| 1199 | 1758 | 2162 | 2823 | 3301 | 3663 | 4026 | 4395 | 4668 | 5154 | 5558 | 6009 | 6496 | 6856 |
| 1204 | 1759 | 2203 | 2826 | 3306 | 3685 | 4049 | 4399 | 4674 | 5177 | 5559 | 6033 | 6497 | 6863 |
| 1215 | 1760 | 2205 | 2829 | 3308 | 3693 | 4054 | 4404 | 4682 | 5178 | 5560 | 6056 | 6511 | 6865 |
| 1219 | 1762 | 2221 | 2832 | 3314 | 3702 | 4060 | 4416 | 4701 | 5227 | 5567 | 6069 | 6542 | 6877 |
| 1231 | 1771 | 2259 | 2835 | 3319 | 3703 | 4063 | 4424 | 4706 | 5234 | 5575 | 6086 | 6580 | 6878 |
| 1250 | 1786 | 2260 | 2869 | 3326 | 3704 | 4069 | 4432 | 4714 | 5235 | 5582 | 6089 | 6604 | 6911 |
| 1257 | 1810 | 2266 | 2870 | 3328 | 3716 | 4079 | 4439 | 4730 | 5239 | 5589 | 6092 | 6610 | 6968 |
| 1261 | 1818 | 2270 | 2872 | 3329 | 3733 | 4082 | 4442 | 4741 | 5250 | 5590 | 6108 | 6616 | 6971 |
| 1271 | 1822 | 2289 | 2877 | 3331 | 3740 | 4085 | 4443 | 4744 | 5258 | 5629 | 6137 | 6626 | 6977 |
| 1280 | 1824 | 2323 | 2922 | 3336 | 3766 | 4089 | 4446 | 4775 | 5264 | 5665 | 6157 | 6632 | 6987 |
| 1289 | 1833 | 2332 | 2926 | 3338 | 3770 | 4119 | 4453 | 4779 | 5279 | 5674 | 6159 | 6637 | 6988 |
| 1309 | 1843 | 2345 | 2938 | 3341 | 3772 | 4147 | 4458 | 4794 | 5281 | 5695 | 6167 | 6639 | 6996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र सह्याद्री • विजयालक्ष्मी विकली लॉटरी • (महाराष्ट्र राज्य लॉटरी) — सोडत सायं. 5:15 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 18 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 04/05/2022

पहिले सामाईक बक्षिस रु. 10000/- : **SV-09 : 5350**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| दुसरे बक्षिस रु. 2000/- | | | | |
|---|---|---|---|---|
| 1731 (महाराजा एन्टरप्रायझेस, इचलकरंजी (5 बक्षिसे)) | 2176 (डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली (5 बक्षिसे)) | 3261 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई (5 बक्षिसे)) | 3314 (प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स, कल्याण (5 बक्षिसे)) | 4989 |

| तिसरे बक्षिस रु. 1000/- | चौथे बक्षिस रु. 500/- | पाचवे बक्षिस रु. 400/- |
|---|---|---|
| 1348 | 1313 | 1038 |
| 1751 | 1341 | 1214 |
| 2336 | 1956 | 1565 |
| 2420 | 2008 | 2046 |
| 2507 | 2170 | 2361 |
| 2932 | 2456 | 3956 |
| 3009 | 3207 | 4021 |
| 3129 | 3294 | 4430 |
| 3229 | 3439 | 4554 |
| 3390 | 3550 | 4573 |
| 3761 | 4332 | 4736 |
| 4014 | 4838 | 4905 |
| 4344 | 5047 | 5315 |
| 4496 | 5513 | 5473 |
| 4523 | 5638 | 5755 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र गजलक्ष्मी • बुध विकली लॉटरी • (महाराष्ट्र राज्य लॉटरी) — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 18 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 04/05/2022

पहिले बक्षिस रु. 100000/- : **GL-06 : 3673**

उत्तेजनार्थ बक्षिस रु. 2500/- : 3673

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 5044 | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 2242 (डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली (5 बक्षिसे)) | 3636 | 4609 | 5408 | 5902 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1161 | 2521 | 3245 | 5159 | 5412 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1925 | 2671 | 3360 | 3834 | 5154 |

पाचवे बक्षिस रु. 50/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1281 | 1772 | 2170 | 2692 | 3233 | 3469 | 3939 | 4466 | 5109 | 5592 |
| | 1284 | 1791 | 2183 | 2721 | 3235 | 3493 | 3980 | 4472 | 5115 | 5605 |
| | 1287 | 1799 | 2226 | 2726 | 3237 | 3527 | 3995 | 4493 | 5117 | 5611 |
| 1007 | 1289 | 1817 | 2256 | 2828 | 3243 | 3528 | 4004 | 4495 | 5119 | 5626 |
| 1013 | 1293 | 1855 | 2263 | 2892 | 3246 | 3533 | 4005 | 4510 | 5156 | 5629 |
| 1014 | 1307 | 1861 | 2272 | 2902 | 3250 | 3553 | 4010 | 4569 | 5168 | 5645 |
| 1031 | 1316 | 1870 | 2284 | 2909 | 3292 | 3609 | 4047 | 4588 | 5254 | 5656 |
| 1053 | 1444 | 1872 | 2292 | 2964 | 3297 | 3623 | 4048 | 4656 | 5375 | 5658 |
| 1061 | 1451 | 1888 | 2294 | 2981 | 3299 | 3627 | 4069 | 4694 | 5383 | 5670 |
| 1078 | 1476 | 1896 | 2303 | 2989 | 3311 | 3657 | 4076 | 4739 | 5389 | 5675 |
| 1094 | 1496 | 1901 | 2326 | 2990 | 3316 | 3734 | 4169 | 4764 | 5398 | 5685 |
| 1095 | 1571 | 1909 | 2369 | 3030 | 3332 | 3746 | 4170 | 4846 | 5457 | 5686 |
| 1107 | 1609 | 1911 | 2376 | 3031 | 3333 | 3753 | 4172 | 4847 | 5469 | 5687 |
| 1130 | 1627 | 1912 | 2389 | 3039 | 3341 | 3783 | 4233 | 4877 | 5473 | 5690 |
| 1138 | 1670 | 1913 | 2392 | 3093 | 3343 | 3793 | 4247 | 4884 | 5475 | 5695 |
| 1164 | 1671 | 1950 | 2402 | 3114 | 3350 | 3830 | 4264 | 4894 | 5521 | 5696 |
| 1174 | 1681 | 1957 | 2505 | 3132 | 3355 | 3835 | 4360 | 4901 | 5532 | 5701 |
| 1177 | 1697 | 1989 | 2522 | 3140 | 3363 | 3839 | 4439 | 4964 | 5552 | 5777 |
| 1178 | 1701 | 2002 | 2526 | 3144 | 3368 | 3842 | 4446 | 4975 | 5553 | 5790 |
| 1198 | 1713 | 2092 | 2564 | 3189 | 3373 | 3863 | 4448 | 4983 | 5555 | 5807 |
| 1223 | 1722 | 2121 | 2570 | 3194 | 3379 | 3887 | 4451 | 5006 | 5559 | 5814 |
| 1226 | 1726 | 2133 | 2594 | 3230 | 3389 | 3894 | 4452 | 5010 | 5565 | 5940 |
| 1227 | 1756 | 2151 | 2601 | 3231 | 3437 | 3923 | 4454 | 5075 | 5579 | 5962 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# मोबाईलने उत्तम फोटो काढण्यासाठी

**एखादा खास क्षण साजरा करताना किंवा एखाद्या नव्या ठिकाणी फिरताना फोटो काढण्याचा मोह आवरणे जरा कठीणच असते. त्यात आत्ताच्या सोशल मीडियाच्या काळात फेसबुक, इन्स्टाग्रामवर लगेच फोटो शेअर करून त्यावर लाईक्स मिळवण्याची चढाओढदेखील असते. हे सगळे फोटो काढायला महागडा कॅमेरा आपल्याकडे असायलाच पाहिजे असे काही नाही. आजकाल मिळणाऱ्या स्मार्टफोन्समध्ये देखील चांगले कॅमेरा असल्याने उत्तम फोटो काढू शकतो. आपल्या फोनमध्ये काही विशिष्ट ट्रिक्स वापरुन आपल्याला अगदी लाईक्सचा पाऊस पडेल असे फोटो काढता येतील...**



**कॅमेरा लेन्स स्वच्छ पुसा...**

प्रसिद्ध फोटोग्राफर्स सुद्धा फोटो काढायला सुरुवात करताना पहिले काम करतात ते म्हणजे कॅमेराची लेन्स स्वच्छ पुसून घेतात. त्यामुळे मोबाईल काढून एखादा फोटो क्लिक करण्याआधी हा पहिला नियम लक्षात ठेवा. त्या मोबाईलची कॅमेरा लेन्स नीट स्वच्छ करून घ्या. अनेकदा लेन्सवर बसलेली धूळ डोळ्यांना दिसत नाही पण त्यामुळे फोटो काढताना धुसर येतात.

हे टाळण्यासाठी कॅमेरा लेन्स स्वच्छ पुसणे महत्त्वाचे ठरते. अनेकांना स्वत:च्या जिन्सला घासून किंवा ओल्या कापडाने लेन्स आणि स्क्रिन पुसायची सवय असते, हे टाळायला पाहिजे. असे केल्याने लेन्स तात्पुरती जरी स्वच्छ होत असली तरी काही काळाने खराब होण्याची किंवा त्यावर ओरखडे पडण्याची भीती असते. त्याऐवजी लेन्स पुसण्यासाठी खास 'मायक्रो फायबर' कापड मिळते ते वापरा.

**प्रकाशाचा योग्य वापर...**

चांगल्या फोटोग्राफीसाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रकाश. तुम्ही फोटो काढताना योग्य प्रकाश आहे किंवा नाही ते तपासून पाहा. प्रत्येक स्मार्टफोनमध्ये फ्लॅशचा पर्याय उपलब्ध असतो. परंतु फ्लॅश वापरून काढलेले फोटो आणि नैसर्गिक प्रकाशात काढलेले फोटो यात जमीन अस्मानाचा फरक असतो. त्यामुळे फ्लॅशचा कमीत कमी वापर करून फोटो काढण्याचा प्रयत्न करा. जर तुम्ही दिवसा फोटो काढत नसाल अशावेळी फोटो काढताना प्रकाशाचे इतर स्त्रोत शोधण्याचा प्रयत्न करा. उदा- अस्ताला जाणारा सूर्य, घरातील दिवे किंवा मेणबत्तीचा प्रकाश. असे फोटो काढताना तुम्हाला कलात्मकता दाखवायलाही वाव मिळेल.

**HDR ऑन करा, ISO ॲड्जस्ट करा:**

रात्री फोटो काढताना फोनमधील HDR फीचर ऑन करा. या फीचरमुळे लाईट बॅलन्स करून चांगला फोटो येण्यास मदत होते. त्याचबरोबर सर्व स्मार्टफोन्समध्ये ISO फीचर असते. त्यामुळे कमी प्रकाशात देखील चांगला फोटो येईल. हा फोटो काढण्यासाठी ISO ॲडजस्ट करावा लागतो. कमी प्रकाशात ISO वाढवून तुम्ही उत्तम फोटो काढू शकता.

**पोर्ट्रेट मोडचा वापर...**

तुम्हाला जर फोटोच्या बॅकग्राऊंडला ब्लर करायचे असल्यास फोनमध्ये पोर्ट्रेट मोड ऑन करा. हा पर्याय वापरल्याने अनेकदा DSLR सारखे फोटो क्लिक करता येतात. तुम्हाला सोशल मीडिया अकाऊंटसाठी चांगले 'डी.पी' पाहिजे असल्यास पोट्रेट मोडचा वापर करून फोटो काढून बघा.

**झुम करू नका...**

मोबाईलवर फोटोग्राफी करताना झून इन आणि झून आऊटवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. तुम्ही फोटो क्लिअर यावा म्हणून अधिक झूम केलात तर तो धुसर दिसतो. त्यामुळे तुम्हाला एखाद्या वस्तूचा फोटो काढायचा असल्यास मोबाईल कॅमेरा झूम न करता स्वत:ची जागा बदला. त्या वस्तूच्या जितक्या जवळ जाणे शक्य होईल तितके जा आणि फोटो काढा.

**एडिटिंग ॲप्सचा वापर...**

फोटो काढल्यानंतर तो अधिक सुंदर बनवण्यासाठी एडिटिंगचा पर्याय नेहमीच वापरता येतो. त्यासाठी महागडे सॉफ्टवेअर किंवा लॅपटॉप खरेदी करण्याची गरज नाही. मोबाइलच्या ॲप स्टोअरमध्ये जाऊन फोटो एडिटिंगचे वेगवेगळे ॲप्स अगदी फुकट डाऊनलोड करता येऊ शकतात. हे ॲप्स वापरायला देखील सोपे असतात आणि फोटो अधिक चांगले दिसण्यात या ॲप्सची मदत होते. 'स्नॅपसीड', 'पिक्सआर्ट फोटो स्टुडिओ' यांसारख्या ॲप्सचा वापर तुम्ही एडिटिंगसाठी करू शकता.

## राज्यात १८८ नव्या कोरोना रुग्णांची नोंद

■ मुंबई

**राज्यातील** कोरोनाच्या रुग्णसंख्येत दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. आज बुधवारी राज्यात १८८ नव्या रुग्णांचे निदान झाले आहे. राज्यातील ॲक्टिव्ह रुग्णसंख्या देखील हजारापार गेली आहे. राज्यात सध्या १०४९ ॲक्टिव्ह रुग्ण आहे. तसेच गेल्या चोवीस तासांत एका कोरोनाबाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. राज्यात गेल्या २४ तासात १६६ रुग्ण कोरोनामुक्त होऊन घरी परतले आहेत. राज्याचा मृत्यूदर १.८७ टक्के झाला आहे. राज्यात आतापर्यंत ७७,२९,४६९ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. त्यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९८.११ टक्के झाले आहे.

# बुलढाण्यात हनुमान मंदिरातील बंद असलेले स्पीकरच पोलिसांकडून जप्त

■ बुलढाणा

**महाराष्ट्र** नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे यांनी जाहीर केल्यानुसार राज्यभरात मनसेचे पदाधिकारी हनुमान मंदिरात आरती व हनुमान चालिसा पठण करायच्या तयारीत आहेत. मात्र खामगाव शहरातील चांदमारी भागातील हनुमान मंदिरावर लाऊडस्पीकर लावुन हनुमान चालिसा दररोज सकाळी सहा नंतर आरतीच्या वेळेस वाजवण्यात येते. परंतु शहर पोलीसांनी सकाळी पाचच्या सुमारास चांदमारी येथील मंदिरात जाऊन साउंड सिस्टम मशीन ताब्यात घेतली आहे. विशेष बाब म्हणजे ज्यावेळी लाऊडस्पीकर जप्त करण्यात आला त्यावेळी तो पुर्णपणे बंद होते.



दरम्यान, शहरातील अनेक मशिंदींमध्ये सकाळी सहा वाजण्याच्या आधीच भोंग्यावरुन अजान दिली होती. याबाबत मनसे आनंद गायगोळ यांनी पोलिसांनी मंदिरामध्ये जाऊन गैर कायदेशीररित्या मशीन उचलून नेली असल्याची माहिती दिली आहे. तसंच पोलिसांच्या या कृत्यामुळे हिंदू धर्मियांच्या भावना दुखावल्या असल्याचं त्यांनी सांगितले आहे. तसेच शहरातील अनेक मशिदींमध्ये ज्या वेळेस कायद्यांचे उल्लंघन करत सकाळी सहा वाजायच्या आधीच अजान देण्यात आली. यातील पोलीस आणि मनसे कार्यकर्ते यांच्यात शाब्दिक बाचाबाचीही झाली.तर स्थानिक शिवसेना नेत्यांचा या आंदोलनाला विरोध होत असल्याचे दिसून आले. स्थानिक शिवसेना नेते म्हणतात की राज ठाकरे यांनी अनेक झेंडे बदलले, अनेक भूमिका बदलल्या त्यामुळे त्यांना अशी हिंदुत्ववादी भूमिका घेण्याचा काहीही अधिकार उरलेला नसल्याचं शिवसेना नेते दत्ता पाटील म्हणाले.

# रत्नागिरीत सकाळची अजान भोंग्याविना करण्याचा निर्णय

■ रत्नागिरी

**राज्यात** मशिदीवरील भोंग्यांवरुन वातावरण ढवळून निघाले असतानाच रत्नागिरी शहरातील मुस्लिम बांधवांनी शहरात सकाळच्या अजानवेळी भोंग्यांचा वापर न करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. तसेच भोंग्यांबाबत सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करणार असल्याचेही मुस्लिम बांधवांनी सांगितले.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज बुधवार ४ मे पासून मशिदीवरील भोंगे काढण्याचे आवाहन केले होते. मात्र जिथे भोंगे वाजतील तिथे हनुमान चालिसा लावा, असे आदेश मनसे कार्यकर्त्यांना दिले आहेत. या पार्श्वभूमीवर रत्नागिरी शहरातील मुस्लिम बांधवांची बैठक रत्नागिरी शहर पोलीस स्थानकात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला उपविभागीय पोलीस अधिकारी सदाशिव वाघमारे, शहर पोलीस निरीक्षक विनीत चौधरी उपस्थित होते.

या बैठकीत भोंग्यांच्या वापरावर चर्चा झाली. या चर्चेवेळी सकाळची अजान ही भोंग्यांचा वापर न करता केली जाईल, असे उपस्थित मुस्लिम बांधवांनी सांगितले. तसेच भोंग्यांबाबत सुप्रीम कोर्टाच्या सुचनांची अंमलबजावणी केली जाईल, अशी स्पष्ट भूमिका मांडली. कोणताही अनुचित प्रकार घडला तर कायदा हातात न घेता पोलिसांना त्याची माहिती दिली जाईल, असेही सांगितले.

# राज्यपालांनी नीट विरोधी विधेयक केंद्रीय गृह मंत्रालयाला पाठवले

■ चेन्नई

**मुख्यमंत्री स्टॅलिन यांची माहिती**

**तामिळनाडूचे** राज्यपाल आर.एन.रवी यांनी राज्यातील नीट परीक्षा रद्द करण्याबाबतचे विधेयक केंद्रीय गृहमंत्रालयाला पाठवले आहे. येथून हे विधेयक राष्ट्रपतींच्या विचारार्थ राष्ट्रपती भवनात पाठवले जाईल. मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी आज बुधवारी तामिळनाडू विधानसभेत ही माहिती दिली. स्टॅलिन यांनी सभागृहात सांगितले की, ८ फेब्रुवारी रोजी तामिळनाडू विधानसभेने नीट विरोधी विधेयक दुसऱ्यांदा मंजूर केले.

मात्र, याआधीही तामिळनाडू विधानसभेत राज्याला नीट परीक्षेपासून मुक्त करण्यासाठी विधेयक मंजूर करण्यात आले होते. पण राज्यपालांनी ते परत पाठवले. फेब्रुवारी २०२२ मध्ये राज्य विधानसभेत दुसऱ्यांदा नीट विरोधी विधेयक मंजूर करण्यात आले. तेव्हा राज्यपाल आर.एन. रवी यांना पाठवण्यात आले. त्यानंतर हे विधेयक राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी राज्यपालांनी केंद्रीय गृह मंत्रालयाकडे पाठवले आहे.

# इम्रान खानने सत्ता सोडताच सोबत नेली १५० दशलक्ष रुपयांची बीएमडब्ल्यू कार

■ इस्लामाबाद

**माहिती आणि प्रसारण मंत्री मरियम औरंगजेब यांचा दावा**

**पाकिस्तानच्या** माहिती मंत्री मरियम औरंगजेब यांनी दावा केला आहे की, इम्रान खान यांनी पंतप्रधानांच्या निवासस्थानातून बाहेर पडताना बीएमडब्ल्यू एक्स ५ ही गाडी घेतली. जी मूळतः परदेशी शिष्टमंडळांसाठी पंतप्रधानांची कार होती. औरंगजेब म्हणाले की, पंतप्रधान कायद्यानुसारच कार आपल्या वापरात ठेवू शकतात.

इम्रान खान आधीच परदेशातून मिळालेल्या भेटवस्तूंवर निशाणा साधत आहेत. मंत्री मरियम पुढे म्हणाल्या की, खान यांनी पंतप्रधानांच्या घरात महागड्या गाड्या असल्याबद्दल यापूर्वीच्या सरकारांवर टीका केली होती. तरीही त्यांनी आग्रह धरला आहे की, त्यांना कार ठेवायची आहे. २०१६ मध्ये ही कार खरेदी केली गेली तेव्हा तिची किंमत ३० दशलक्ष पाकिस्तानी रुपये होती. जी आता ६० दशलक्ष पाकिस्तानी रुपये झाली आहे. बॉम्ब-प्रूफिंगसह ही गाडी बुलेट-प्रूफिंग आहे. या गाडीची किंमत आता सुमारे १५० दशलक्ष पाकिस्तानी रुपये आहे. मरियम औरंगजेब म्हणाल्या की, इम्रान खानने गिफ्ट रिटेन्शन टक्केवारी २० टक्के कमी केली आणि नंतर ती ५० टक्के केली. त्यानंतर खान यांची पत्नी बुशरा बीबीची जवळची मैत्रिण फराह खान यांच्याकडून भेटवस्तू खरेदी केल्या. जी पंजाबमधील प्रत्येक सरकारी अधिकाऱ्याच्या नियुक्तीसाठी लाच घेऊन कोट्यवधी कमावत होती, असा गंभीर आरोपही त्यांनी केला आहे.

# सांगवड सोसायटी निवडणुकीत शिवसेनेचा १३-० ने एकहाती विजय

■ कराड

**पाटण** तालुक्यातील सांगवड येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीची पंचवार्षिक निवडणुक गृहराज्यमंत्री शंभुराजे देसाई यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. सांगवड सोसायटीचे पंचवार्षिक निवडणुकीत श्री सिध्देश्वर शेतकरी विकास पॅनेलने विरोधी पॅनेलचा मोठ्या फरकाने दणदणीत पराभव करुन १३-० ने विरोधी पॅनलला धोबीपछाड केले.

या निवडणुकीत शंभुराजे देसाई यांचे नेतृत्व मानणारे श्री सिध्देश्वर शेतकरी विकास पॅनल प्रचंड बहुमतांनी विजयी झाले. मतदारांनी १३-० अशा फरकाने विजयी करुन मंत्री शंभुराजे देसाई यांच्या नेतृत्वाखाली पॅनेलवर सभासदांनी शिक्कामोर्तब केले. या निवडणुकीमध्ये विजयी झालेले उमेदवार आप्पासो बंडू नांगरे, मधुकर सुर्यवंशी, तानाजी शेजवळ, सचिन देसाई, संभाजी सुर्यवंशी, हणमंत सुर्यवंशी, सुरेश बांदल, विश्वास शेवाळे, संगीता कदम, इंदुबाई माने, रामचंद्र कांबळे, जगन्नाथ गुरव, तानाजी चव्हाण असे १३ उमेदवार १५० च्या मतांच्या फरकाने निवडून आले आहेत. सांगवड सोसायटीच्या निवडणूक निकालानंतर विजयी उमेदवारांनी गुलालाची उधळण करीत जल्लोष केला.

# फलटणमध्ये दोन कारची धडक दोघांचा जागीच मृत्यू! ११ जखमी

■ फलटण

**फलटण** तालुक्यातील मौजे सुरवडी येथील फलटण- लोणंद महामार्गावर जगताप वस्ती नजीक भीषण अपघातात २ जण जागीच ठार तर ११ जण गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे.



याबाबात घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, फलटण- लोणंद रोडवर जगताप वस्ती नजीक इंडिका कार आणि तवेरा या गाडीचा समोरा समोर भीषण असा गंभीर स्वरूपाचा अपघात झाला आहे. अज्ञात कोणत्यातरी कामानिमित्ताने पुणे येथे गेली होती. पुणे येथून परत येताना फलटण तालुक्यातील सुरवडी येथील फलटण-लोणंद रोडवर जगताप वस्ती येथे भीषण अपघात झाला असून यातील गोट्या उर्फ सचिन भारत काळेल व शुभम केवटे हे जागीच ठार झाले आहेत. या अपघातात दैवत शामराव काळेल, मल्लिकार्जुन विरलप्पा शिरगुंडे, सुवर्णा मल्लिकार्जुन शिरगुंडे, गंगाधर गुंडप्पा बेळंबगी, पौर्णिमा गंगाधर बेळंबगी, व त्यांची मुलं रचित व रचना पुजा अरुण कुमार पाटील व त्यांची दोन मुले अद्विक व प्रणम्या हे तवेरा गाडीतील गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर फलटण शहरातील लाईफ लाईन व निकोप हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. काही लोक गंभीर जखमी झाले आहेत.

# आगामी निवडणुकीत ओबीसींना भाजपा २७ टक्के आरक्षण देईल

■ मुंबई

**चंद्रकांत पाटील यांची ग्वाही**



**सर्वोच्च** न्यायालयाने आज निवडणुकीबद्दल महत्वाचा निर्णय जाहीर केला. येत्या २ आठवड्यात निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्याचे निर्देश दिले होते. यावर प्रतिक्रिया देताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील म्हणाले कि, ओबीसींच्या आरक्षणाशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार हे सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या आदेशामुळे स्पष्ट झाले आहे. शिवसेना , काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसच्या महाविकास आघाडी सरकारने ओबीसींची फसवणूक केली असून पाठीत खंजीर खुपसला आहे. तथापि, आगामी निवडणुकीत भाजपा मात्र २७ टक्के तिकिटे ओबीसींना देऊन या समाजाला न्याय देईल, अशी ग्वाही प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी दिली. ते कोल्हापूर येथे पत्रकारांशी बोलत होते.

यावेळी बोलताना चंद्रकांत पाटील म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे आता स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक होईल. भाजपा निवडणुकीसाठी सदैव सज्ज असतो. आम्ही निवडणूक लढवू आणि त्यामध्ये भाजपाची उमेदवारी देताना प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेत एकूण जागांपैकी २७ टक्के जागांवर ओबीसींना तिकिटे देऊन भाजपातर्फे या समाजाला न्याय देऊ. काही काळापूर्वी सहा जिल्हा परिषदांच्या ओबीसी आरक्षित जागा रद्द होऊन पोटनिवडणुका झाल्या असता भाजपाने त्या खुल्या झालेल्या ओबीसींच्या जागेवर ओबीसींनाच तिकीट देऊन निवडून आणले होते, असेही चंद्रकांत पाटील म्हणाले.

# 'महाज्योती'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मासिक शिष्यवृत्तीत वाढ

■ मुंबई

**महाज्योतीच्या** माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मासिक शिष्यवृत्तीत घसघशीत वाढ करण्यात आली आहे. २१ हजारांची मासिक शिष्यवृत्ती ३१ हजारांपर्यंत वाढवण्यात आली आहे. पीएचडीकरता निवडलेल्या ७५३ विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे.

महाज्योती तर्फे विद्यार्थ्यांना विनामूल्य स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण देण्यात येते. याकरीता साडेचार कोटींचा अतिरिक्त भार सरकारच्या तिजोरीवर येणार आहे. या शिष्यवृत्तीसाठी ३५ कोटींचा वार्षिक खर्च आहे. महाज्योतीतर्फे पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी २१ हजार रुपयांची मासिक शिष्यवृत्ती देण्यात येते. या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याची मागणी विद्यार्थ्यांनी केली होती. या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन केले. अखेर विद्यार्थ्यांच्या या मागणीला यश मिळाले असून आता शिष्यवृत्तीत वाढ करण्यात आली आहे.

# कचरा डेपो आगीच्या चौकशीला सुरुवात अजित गव्हाणेंनी उपस्थित केले १४ मुद्दे

■ पिंपरी, प्रतिनिधी

**येथील** कचरा डेपोला ६ एप्रिल रोजी लागलेल्या आगीच्या चौकशीला आज सुरुवात झाली आहे. आजच्या चौकशीदरम्यान अजित गव्हाणे यांनी तब्बल १४ मुद्दे उपस्थित केल्याने सत्ताधारी भाजपाच्या भ्रष्टाचाराचे पितळ उघडे पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

भाजप नेते आणि ठेकेदारांच्या संगनमताने झालेला भ्रष्टाचार लपविण्यासाठी मोशीतील कचरा डेपोला आग लावण्यात आल्याचा संशय राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी व्यक्त केला होता. त्यानंतर गव्हाणे यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यानंतर अखेर सोमवारपासून या प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली आहे. मोशी येथील कचरा डेपोला ६ एप्रिल रोजी आग लागली होती. या आगीबाबत अजित गव्हाणे यांनी संशय व्यक्त करत आग लागली की लावली? याची चौकशी करण्याची मागणी केली होती.

यानंतर पुन्हा १६ एप्रिल रोजी आगीची दुसरी घटना याच ठिकाणी घडल्यानंतर महापालिका आयुक्तांनी आगीच्या चौकशीसाठी दोन सदस्यीय समितीची नियुक्ती केली होती. या समितीच्या माध्यमातून आजपासून आगीच्या घटनेच्या चौकशीला सुरुवात झाल्याची माहिती अजित गव्हाणे यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, प्रशासनाने आमच्या मागणीची दखल घेऊन चौकशी सुरू केली आहे त्याबद्दल मी प्रशासनाचा आभारी आहे.

अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ आणि शहर अभियंता राजन पाटील यांच्या समितीच्या माध्यमातून कचरा डेपोतील आगीची सखोल चौकशी करण्यात येत आहे. प्रामुख्याने कचरा डेपोमध्ये असलेल्या मेकॅनिकल कम्पोस्टिंग, सॅनिटरी लॅन्डफिल, प्लास्टिक टू फ्युएल प्लान्ट, वर्मी कम्पोस्टिंग प्लान्ट, प्लास्टिक वेस्ट टू ग्रॅन्युएल्स, वेस्ट टू एनर्जी या प्रकल्पातील ठेकेदारांना वाचविण्यासाठी व त्यांचा भ्रष्टाचार उघड पडू नये म्हणून ही आग लावण्यात आली आहे. शहरातून रोज अकराशे टन कचरा जमा होत असताना प्रत्यक्षात मात्र केवळ २५० ते ३०० मेट्रिक टन करण्यावरच प्रक्रिया केली जात आहे.







संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# पायाभूत सुविधांच्या वावटळीत मूलभूत गरजांचा विसर

देशात किंवा समाजात अनेक विषयांवरून वादविवाद किंवा मतभेद सुरु असतात. अनेक ठिकाणी अनेक लोक आपण अभ्यासक असल्याचा दावा करून नको ते विषय उकरूनही काढत असतात. समाजकारण, राजकारण, आर्थिक किंवा सांस्कृतिक क्षेत्रामध्ये हे सगळे प्रकार पाहायला मिळतात. विकासाचा मुद्दा आला की पायाभूत सुविधांचा डांगोरा पिटला जातो आणि सामाजिक प्रश्नांचा किंवा समस्यांचा उल्लेख झाला की मूलभूत हक्क किंवा अधिकारांचा प्रश्न उपस्थित केला जात असतो. शब्द कोणतेही वापरले तरी त्यांचा संबंध हा समस्यांशी किंवा वेगवेगळ्या प्रश्नांशी जोडला जात असतो. रोजगार नाही म्हणजे कारखानदारी हवी. औद्योगिकरण व्हायला हवे. औद्योगिकरण करायचे असेल तर त्या कारखान्यांसाठी रस्ते, पाणी, वीज यासारख्या पायाभूत सुविधा दिल्या गेल्या पाहिजेत. परदेशातल्या अनेक पायाभूत सुविधांचे मॉडेल डोळ्यासमोर ठेवून विकासाचा हा नवा नमुना वारंवार मांडण्याचा प्रयत्न होतो. सध्या केंद्र असो किंवा ठिकठिकाणची राज्य सरकारे असोत. हे अशा प्रकारच्या पायाभूत सुविधांवर प्रचंड खर्च करीत असतात. त्यातही रस्ते बांधणी आणि वीजेची जोडणी याकरीता विशेष निधी पुरवला जातो. त्या त्या भागातील कारखान्यांची गरज लक्षात घेऊन पाण्याचाही अखंड पुरवठा होईल याची पुरेपूर काळजी घेतली जाते. परंतु या पायाभूत सुविधांच्या वावटळीत मूलभूत सुविधांचा अजिबात विचार होताना दिसत नाही. ज्यामध्ये शुध्द आणि पुरेसे पिण्याचे पाणी, चांगली आरोग्यव्यवस्था आणि परवडेल असे सर्व प्रकारचे शिक्षण या गोष्टींचा समावेश होतो. आज एकीकडे सूर्य विक्रमी अशी आग ओकत असताना जीवाची काहिली होत असताना देशाच्या सत्तर टक्के भागात पुरेसे शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध होत नाही. मोठमोठी महानगरे वगळता जिल्हा, तालुका किंवा ग्रामपंचायतीपर्यंत पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. म्हणजे पाणी ही जी अत्यंत आवश्यक गरज असते त्याचीदेखील जर पूर्तता होऊ शकत नाही अशावेळी इतर पायाभूत सुविधांसाठी केला जाणारा अट्टाहास कितपत योग्य आहे. असा प्रश्न निर्माण होतो.

**पाण्यासाठी दाहीदिशा**

आज महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यांमध्ये , गावांमध्ये सरासरी चार ते आठ दिवसांनी पिण्याचे पाणी पोहचवले जाते. रोज शुध्द ताजं पाणी मिळत नाही. उन्हाळ्यामध्ये ही समस्या अधिक तीव्र होते. आता तर शहरांमध्येसुध्दा पन्नास टक्के गृहनिर्माण संस्थांमध्ये टँकरने पाणीपुरवठा होतो. गेल्या दहा वर्षात राज्यातली पाणीटंचाई अशा एका टोकाला येऊन पोहचली की लोकांनीच त्यातून मार्ग शोधून काढले म्हणजे आता पाण्याचा चक्क व्यवसाय सुरु झालेला आहे. घराघरामध्ये दहा पंधरा लीटरच्या पाण्याच्या टाक्या दररोज पोहचवल्या जातात. नळाला येणारे पाणी शुध्द नसतेच. शिवाय त्याच्या वेळाही नक्की नसल्याने लोकांना आपल्या पाण्याची मूलभूत गरज भागवण्याकरीता पैसे मोजूनच पाणी घ्यावे लागते आहे. याचा अर्थ कोणालाही पाणी फुकट दिले जाते असा नाही. परंतु योग्य ती पाणीपट्टी घेऊन गरजेइतके पाणी उपलब्ध करून देण्याचे बंधनकारक कर्तव्य महापालिकांना पारपाडावे लागते. परंतु ते पाळले जात नाही. लोकसंख्या आणि पाण्याची गरज या सगळ्यांचा मेळ बसत नसल्यामुळे दुकानांवर मिळणाऱ्या बिसलरी पाण्याच्या बाटल्यांशिवाय आता घरोघरी दहा दहा लीटरच्या पाण्याच्या टाक्या पोहचवल्या जातात. म्हणजे ज्याप्रमाणे दूधवाला दूध आणून देतो त्याप्रमाणे आता दरदिवशी पाणीवालासुध्दा ही पाच दहा लीटरची पाण्याची टाकी घरी आणून देऊ लागला आहे हे चित्र देशाच्या सर्व भागामध्ये आहे. जिथे पायाभूत सुविधांचे ढोल बडवले जात असताना जीवनावश्यक अशी पाण्याची मूलभूत गरज प्राधान्याने पूर्ण करावी असे कोणालाही वाटत नाही. बिसलरीच्या बाटल्यांमधील पाणी पिऊन मोठमोठ्या घोषणा होत असतात. पण गावोगावी लोकांचे घसे कोरडे पडतात. नद्या पावसाळा संपताच आटू लागतात. अशी ही पाण्याची भीषण टंचाई दिवसेंदिवस उग्र स्वरूप धारण करते आहे. या पार्श्वभूमीवर पायाभूत सुविधा महत्त्वाच्या की मूलभूत सुविधा महत्त्वाच्या हा प्रश्नदेखील सोडवला गेला पाहिजे.

**विकासाचे बुजगावणे**

पाण्याप्रमाणेच गावोगावच्या आरोग्यसुविधांबाबत हीच परिस्थिती पाहायला मिळते. आज माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. अनेक व्यवहार ऑनलाईन पध्दतीने होतात. परंतु आरोग्य हे क्षेत्र असे आहे की जिथे चांगल्या सामुग्री आणि साधनसुविधांचीच प्रत्यक्ष आवश्यकता असते. मोठमोठ्या शहरांमध्ये प्रचंड पैसे देऊन पंचतारांकित रुग्णालये पाहायला मिळतात. पण गावामध्ये पाच सुविधासुध्दा रुग्णालयांमध्ये धडपणाने उपलब्ध होत नाहीत. अजूनही उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेशचा आदिवासी भाग, महाराष्ट्रातले आदिवासी पाडे इथे प्राथमिक आरोग्य केंद्रांशी दूरावस्था पाहायला मिळते. ही बाब कोरोनाच्या काळात प्रकर्षाने समोर आली होती. काही प्रमाणात आरोग्य व्यवस्थेला रुळावर आणण्याचे प्रयत्न झाले. परंतु आता कोरोना संपल्यानंतर पुन्हा ये रे माझ्या मागल्या अशी परिस्थिती सुरु झालेली आहे. आरोग्य केंद्रांबरोबरच प्राथमिक शिक्षणाचाही बोजवारा उडाल्याचेच चित्र दिसून येते. जे शिक्षण व्यक्ती आणि समाजाला घडवण्याचे काम करते. त्या शिक्षणाची होणारी आबाळ मूलभूत सुविधा मानायची की नाही. या सर्व गोष्टी उपलब्ध करून देण्याची मुख्य जबाबदारी शासनयंत्रणांची असते. त्यासाठी उपलब्ध होणारा निधी आणि पायाभूत सुविधांवर खर्च होणारा पैसा याची जर तुलना केली तर जमीन आसमानाचा फरक असल्याचे पाहायला मिळेल. बदललेल्या काळाबरोबर समस्यांकडे पाहाण्याचा दृष्टीकोनही बदलायला हवा. परंतु समस्याही तशाच आहेत आणि त्या सोडवण्याबाबतचा हलगर्जीपणाही त्याच पध्दतीचा आहे. जगण्याच्या किमान गरजांना सर्वाधिक प्राधान्य देणे केवळ विकासाचे बुजगावणे उभे करून मूलभूत सुविधांची राखण होणार नाही हे अतिशय गांभिर्याने समजून घेण्याची वेळ आलेली आहे.

# प्रथम फलंदाजी घेण्याचा निर्णय गुजरातच्या अंगलट
# पंजाबचा ७ गडी राखून मोठा विजय

**नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी घेण्याचा निर्णय गुजरात टायटन संघाचा कर्णधार हार्दिक पंड्या याच्या चांगलाच अंगाशी आला. कारण पंजाबचा वेगवान गोलंदाज रबाडा याच्या भेदक गोलंदाजी समोर गुजरातचा साई सुदर्शन सोडून एकही फलंदाजाचा टिकाव लागला नाही आणि २० षटकात गुजरातला फक्त १४४ धावा करता आल्या. त्यामुळे पंजाबने ७ गडी राखून गुजरातचा पराभव केला.**



■ नवी मुंबई

**गुजरातची** सुरुवात निराशाजनक झाली सलामीचा शुबमन गिल ९ धावांवर धावचित झाला. तर वृद्धिमान सहा सुद्धा २१ धावांवर परतला अशा तऱ्हेने ३४ धावात २ बळी गेल्याने गुजरातच्या तंबूत खळबळ माजली आणि त्यानंतर कर्णधार हार्दिक पंड्या१, मिल्लर ११, तेवतीय ११, रशीद खान ०, संगवान २, फर्ग्युसन ५,जोसेफ ४, असे गुजरातचे ७ फलंदाज अवघ्या ३४ धावात बाद झाले.

रबाडाने सर्वाधिक ४ बळी घेतले गुजरातकडून एकटा साई सुदर्शन याने पंजाबच्या गोलंदाजीचा मुकाबला करीत ६५ धावा केल्या त्यामुळेच गुजरातला २० षटकात १४४ धावा करता आल्या दरम्यान टार्गेट छोटे असल्याने पंजाबचा विजय जवळपास नक्की होता पण पंजाबची सुद्धा खराब सुरुवात झाली सलामीवीर बेरीस्टो याचा फॉल्प शो सुरूच आहे. या सामन्यात सुद्धा १ धावेवर तो बाद झाला.




मात्र त्यानंतर शिखर धवन आणि राजपक्षे यांनी तिसऱ्या विकेटसाठी ८७ धावांची भागीदारी केली धवन याने ५३ चेंडूत ६२ धावा केल्या. तर राजपक्षे याने ४० धावा केल्या. पुढे उरलेले काम लिव्हिंगस्टोन याने केले आणि पंजाबने ७ गडी राखून हा सामना जिंकला.

दरम्यान या सामन्यानंतर गुजरातचा कर्णधार हार्दिक पंड्या याच्यावर टीकेची झोड उठली आहे कारण खेळपट्टीचा अंदाज न घेता हार्दिकने फलंदाजी घेतली आणि गुजरात टायरनला पराभवाच्या समुद्रात बुडवले. या पराभवाला हार्दिक जबाबदार असून त्याच्याकडचे कर्णधारपद काढून घ्यावे अशी मागणी केली जात आहे.

## महिला टेबल टेनिस रँकिंगमध्ये मनिका बात्राची ३८ व्या स्थानी झेप

■ लंडन

**आंतरराष्ट्रीय** टेबल टेनिस महासंघाने नुकतीच खेळाडूंची नवीन रँकिंग जारी केली असून महिला एकेरीत भारताची मानिका बात्रा ही ३८ व्या स्थानी पोहोचली आहे.



मनिकासह भारताच्या अन्य तीन महिला टेबल टेनिस खेळाडूंनीही शंभर महिलाच्या यादीत स्थान मिळवले आहे. पुरुषांमध्ये साथियन ३४ व्या तर शरत कमाल ३७ व्या स्थानी आहे. विशेष म्हणजे या दोघांच्या व्यतिरिक्त अन्य एकही भारतीय खेळाडू १०० जणांच्या यादीत नाही. मनिका बात्रा ही भारताची स्टार टेबल टेनिस खेळाडू आहे. तिचे रैंकिंग सुधारले आहे. म्हणूनच यावेळी तिने ३८ व्या स्थानी झेप घेतली तिच्या नंतर अर्चना कामथ ही ६६ व्या क्रमांकावर तर श्रीजा अकुला ६८ व्या स्थानी आहे. पुरुष युगल मध्ये साथियन आणि हरमीत देसाई २८ व्या स्थानी आहेत.

## राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेकरिता ठाण्याचे संघ जाहीर

■ ठाणे

**पुणे** येथे ५मे पासून होणाऱ्या ४८व्या कुमार/कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेकरिता ठाण्याने आपले दोन्ही संघ जाहीर केले. विजय स्पोर्ट्सच्या विघ्नेश चौधरी याच्याकडे कुमार, तर ज्ञानशक्ती युवाच्या मानसी गायकरकडे कुमारी गटाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपविण्यात आली. नुकत्याच झालेल्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेतून हे दोन्ही संघ निवडण्यात आले असून पुणे येथे होणाऱ्या राज्य निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत हे दोन्ही संघ ठाणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.निवडण्यात आलेले संघ खालील प्रमाणे.

**कुमार गट संघ :-** १) विघ्नेश चौधरी-संघनायक - विजय स्पोर्ट्स, २)यश शेळके-ग्रीफीन्स स्पोर्ट्स, ३) आकाश पालकर-ओम न्यू वर्तकनगर, ४) यश भोईर-उजाळा मंडळ, ५)मंगेश सोनावणे-शिवशंकर मंडळ, ६)निखिल भोईर-जय बजरंग, ७)साईराज साळवी-श्री हनुमान मंडळ, ८)दीपक केवट-नवी मुंबई प्रशिक्षण केंद्र, ९)मोहन पुजारी-ग्रीफीन्स स्पोर्ट्स, १०)विशाल पाचारे-चेरोबा स्पोर्ट्स, ११) यश किस्मतराव - जय भीम मंडळ, १२) आदित्य जाधव-विश्वरूप मंडळ.

**कुमारी गट संघ :-** १) मानसी गायकर-संघनायिका- ज्ञानशक्ती युवा, २)देवयानी पाटील-संघर्ष मंडळ, ३) दीपाली पगडे-स्फूर्ती स्पोर्ट्स, ४)पूर्वा इंगवले-ओम न्यू वर्तकनगर, ५)रोशनी माने, ६)तनुजा गोळे- दोन्ही रा.फ.नाईक, ७)आकांक्षा निचिते-किल्ले माऊली, ८) स्वप्नाली खंडागळे-गावदेवी मंडळ, ९) वैष्णवी साळुंखे-ज्ञानशक्ती युवा, १०) सानिया गायकवाड-श्री समर्थ मंडळ, ११)श्वेता केदारे-जय भारत मंडळ, १२) श्रेया गावड.

## टीपीएल टी-२० स्पर्धेत प्रयाग भाटीचे शतक

■ ठाणे

**प्रयाग** भाटीची आक्रमक शतकी खेळी आणि प्रतीक वारंगने गोलंदाजीत दिलेल्या तेवढ्याच तोलामोलाच्या साथीमुळे युनियन क्रिकेट क्लबने साळगावकर स्पोर्ट्स क्लबचा ९० धावांनी दणदणीत पराभव करत महाराष्ट्र माझा सेवा संस्था आयोजित नामदार चषक टीपीएल टी-२० क्रिकेट स्पर्धेत आगेकूच केली. दादोजी कोंडदेव स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात प्रयाग भाटीने आक्रमक खेळ करत प्रतिस्पर्धी गोलंदाजांना विकेट मिळवण्यासाठी अक्षरशः घाम गाळायला लावला. प्रयागने ४८ चेंडूत १० चौकार आणि ९ षटकार ठोकत संघाच्या एकूण धावसंख्येत मोलाचे योगदान दिले.

प्रयागच्या ११६ आणि आकाश पारकरच्या नाबाद ५२ आणि सागर मिश्राच्या ३१ धावांमुळे युनियन क्रिकेट क्लबने २० षटकात ५ बाद २६४ धावांचे आव्हान प्रतिस्पर्धी संघासमोर उभे केले. साळगावकर स्पोर्ट्स क्लबकडून कर्ष कोठारीने ३६ धावांत २ आणि दिनेश ठाकुर, प्रणव टिल्लू, चेतन पाटीलने प्रत्येकी एक विकेट मिळवली. या मोठया आव्हानाचा पाठलाग करताना सम्राट नाखवा आणि परेश घाणेकरने धडाकेबाज सुरुवात केली.

## खेलो इंडियामध्ये जैन युनिव्हर्सिटीचे मोठे यश

■ बंगळुरू

**देशभरातील** युनिव्हर्सिटी संघांसाठी आयोजित केलेल्या खेलो इंडिया स्पर्धेत यजमान जैन युनिव्हर्सिटीने २० सुवर्ण पदके जिंकून मोठे यश मिळवले आहे. तर त्या खालोखाल लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीने १७ सुवर्णपदके जिंकून दुसरा क्रमांक पटकावला आहे. पंजाब युनिव्हर्सिटीने १५ सुवर्ण पदके जिंकली आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. जैन युनिव्हर्सिटीच्या शिव श्रीधर याने सात सुवर्ण आणि दोन रजत पदके जिंकली तसेच त्याने २०० मीटर पोहण्याच्या शर्यतीत एक नवा विक्रमही नोंदवला आहे.

## सुविचार


**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

जोपर्यंत तुमचा सामना तुमच्या सर्वांत मोठ्या कमतरतेशी होत नाही, तोपर्यंत तुम्हाला तुमच्या ताकदीची कल्पना येत नाही.

## पंचांग

**गुरुवार ५ मे, २०२२**
**शक १९४४ शुभकृत्नामसंवत्सर**

*** वैशाख शुक्ल चतुर्थी * नक्षत्र : मृग**




**रवी उदय- ०६-१०**
**रवी अस्त- १९-०१**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० मिथुन**

**एकोरामाराध्य जयंती;**
**श्रीरामानुजाचार्य जयंती**




## कलिंगड आईस्क्रीम...



प्रत्यक्षात लागणारा वेळ: १ दिवस ★ **लागणारे जिन्नस:** दोन सूप बोल भरून कलिंगड फोडी बिया काढून. कन्डेन्स्ड मिल्क व्हिप क्रिम, ★ **कृती :-** कलिंगड फोडी फ्रोझन, थंड condensed milk, थंड व पातळ व्हिप क्रीम मिक्सरमध्ये मिश्रण करून घ्या. नंतर प्लास्टिक डब्यात ठेवा. कलिंगड आईस्क्रीम तयार ...


## चॉकलेट डोसा..



**वेळ:-** १० मिनिटे वाढणी: ४ ते ५ डोसे

**साहित्य:-** २ वाट्या डोसा पीठ, चॉकलेट आवडीनुसार, केळ्याचे पातळ काप, तूप

**कृती:-** १) तव्यावर पीठ पातळ पसरवून डोसा घालावा. २) डोसा वरील बाजूने सुकला की वर चॉकलेट किसून घालावे. तूप सोडून डोसा तयार करावा. डोसा सर्व्ह करताना तो फोल्ड करून त्यावर केळ्याचे तुकडे घालून सर्व्ह करावा.







मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**

संपर्क - जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
वितरण विभाग : ९५९४९३६४४१ छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५.
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**

# पिंपरी-चिंचवड भाजपाचा निर्धार 'अब की बार १०० पार'

पिंपरी, प्रतिनिधी

**भारतीय** जनता पार्टी हा पक्ष 'केडर बेस' आहे. आमचे पदाधिकारी, कार्यकर्ते निवडणुकीसाठी कायम सज्ज असतात. त्यामुळे पिंपरी-चिंचवडमध्ये 'अब की बार १०० पार'हा आमचा निर्धार आहे. त्यादृष्टीने आम्ही काम करीत आहोत, अशी प्रतिक्रिया भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी दिली.

सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आठवडाभरात जाहीर करा, असा आदेश आज राज्य निवडणूक आयोगाला दिला. त्यामुळे महापालिका निवडणुका होणार की पुढे जाणार? याबाबत सुरू असलेल्या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे म्हणाले की, भारतीय संविधानाने सर्वोच्च न्यायालयाला सर्वाधिकार दिलेले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणूक कार्यकाळ ५ वर्षे पूर्ण झाला आहे. अशा संस्थामध्ये ६ महिन्यांपेक्षा जास्तकाळ प्रशासक ठेवता येणार नाही, अशी संविधानामध्ये तरतूद आहे. मात्र, राज्यातील अनेक महापालिकांमध्ये ६ महिन्यांपेक्षा जास्तकाळ प्रशासकाच्या माध्यमातून कारभार सुरू होता. आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणूक आयोग निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करणार आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाची संघटनात्मक बांधणी मजबूत आहे. शहरात एकूण ६ मंडल आहेत. मंडल पदाधिकाऱ्यांची संख्या ५५० इतकी आहे. जिल्हा कार्यकारिणी १५० पदाधिकाऱ्यांची आहे.

# गावस्करांनी ३३ वर्षानंतर म्हाडाला परत केली जमीन

मुंबई

**महान** क्रिकेटपटू आणि भारतीय संघाचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी त्यांच्याकडील जमीन अखेर ३३ वर्षांनी म्हाडाला परत केली आहे. मुंबईतील वांद्रे पश्चिम या भागातील मोक्याच्या ठिकाणी असलेला २१,३४८ चौरस फुटांचा हा भूखंड गावस्कर यांना क्रिकेट अकादमी सुरू करण्यासाठी देण्यात आला होता. गावस्कर हे त्या ठिकाणी अकादमी बांधू न शकल्याने त्यांनी अखेर ही जमीन परत केली आहे. म्हाडामार्फत सुनील गावस्कर क्रिकेट फाऊंडेशन ट्रस्टला १९८० च्या दशकामध्ये ही जमीन देण्यात आली होती. मात्र अद्यापही तिथे कोणतीही अकादमी उभी करण्यात आली नव्हती.

## नोटीस

मी, **फिरोज अहमद मोहमद आयुब** नमुद करतो की, माझी पत्नी **कै.रुमाना फिरोज अहमद यांचे दि. २१/१२/२०२१ रोजी** निधन झाले असून त्या डायमंड ज्युबिली हायस्कूल फॉर गर्ल्स, एच.एच. दि आगाखान बिल्डींग, एस.व्ही. पटेल रोड, डोंगरी, मुंबई-४००००९ येथे कार्यरत होत्या. त्यांच्या पश्चात फिरोज अहमद मोहमद आयुब (पती) व इकरा फिरोज अहमद (मुलगी) हे एकमेव वारस आहेत. जर कोणाचीही काही हरकत असल्यास ७ दिवसांच्या आत ब्लॉक नं.८, रु.नं. ६, ट्रान्झीट कॅम्प, भायखळा स्टेशन रोड, भायखळा (प.), मुंबई- ४०००११ या पत्त्यावर संपर्क साधावा.

माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठ ("एनसीएलटी") च्या दि. ०५ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या आदेशानुसार नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या तरतुदीअंतर्गत श्री हनुमान टेक्सफॅब प्रायव्हेट लिमिटेड - परिसमापनामध्ये ("एसएचटीएल")च्या मालमत्तांच्या विक्रीकरिता ई-लिलाव प्रक्रियेकरिता बोली सादर करण्याकरिता स्वारस्य अभिव्यक्ती मागविणाऱ्या दि. ०६ एप्रिल, २०२२ रोजीच्या मुख्य जाहिरातीकरिता आणि २१ एप्रिल, २०२२ रोजी प्रसिद्ध झालेल्या फॉलो ऑन परिशिष्टाकरिता अतिरिक्त जोडपत्र
(सीआयएनः U17121MH2009PTC192331)

## ईओआयचे सादरीकरण आणि ई-लिलावाच्या दिनांकाकरिता विस्तार सूचना

सदर सूचना वृत्तपत्र फ्री प्रेस जर्नल आणि नवाकाळ मुंबई आवृत्ती/ एसएचटीएलच्या वेबसाईटवर दि. ०६ एप्रिल, २०२२ रोजी प्रसिद्ध झालेल्या श्री हनुमान टेक्सफॅब प्रायव्हेट लिमिटेड परिसमापनामध्ये च्या मालमत्तांकरिता बोली सादर करण्याकरिता स्वारस्य अभिव्यक्ती ("ईओआय") मागविणाऱ्या जाहिरातीच्या (मुख्य जाहिरात) संदर्भात आहे. ज्या मागोमाग वृत्तपत्र फ्री प्रेस जर्नल आणि नवाकाळ मुंबई आवृत्ती/ एसएचटीएलच्या वेबसाईटवर दि. २१ एप्रिल, २०२२ रोजी परिशिष्ट प्रसिद्ध झाले होते. या संदर्भात, एसएचटीएलचे परिसमापक याद्वारे अतिरिक्त परिशिष्टाद्वारे सूचित करीत आहेत की, ईओआय आणि ईएमडीच्या सादरीकरणाचा अंतिम दिनांक १७ मे, २०२२ पर्यंत वाढविण्यात येत आहे आणि ई-लिलावाचा दिनांक पुढे २० मे, २०२२ पर्यंत वाढविण्यात येत आहे. दि. ०६ एप्रिल, २०२२ रोजीच्या मुख्य जाहिरातीमधील इतर सर्व अटी आणि शर्तींमध्ये कोणताही बदल नाही. इच्छुक अर्जदार वेबसाईट www.shreehanumantexfab.co.in आणि https://nbid.nesl.co.in/ वर उपलब्ध ई-लिलावाच्या अटी आणि शर्तींचे तपशील समाविष्ट असलेले संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया कागदपत्रे आणि अतिरिक्त परिशिष्ट कागदपत्राचा संदर्भ घ्यावा. परिसमापक कोणतेही कारण न दर्शविता आणि कोणत्याही प्रकारच्या दायित्वाशिवाय प्रक्रिया रद्द करण्याचे किंवा त्यात सुधारणा करण्याचे हक्क राखून ठेवीत आहेत.हे प्रस्ताव कागदपत्र नाही. सदर बोली प्रक्रिया ही आयबीसी, २०१६ च्या नुसार, निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्यांच्या आवश्यक परवानगीच्या अधीन आहे.

दिनांकः ०५ मे, २०२२
ठिकाणः मुंबई

सही/-
**गणेश वेंकटा सिवा रामा क्रिश्ना रेमानी**
श्री हनुमान टेक्सफॅब प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक
आयबीबीआय नोंद. क्र.: IBBI/IPA-001/IP-P01386/2018-19/12176
संपर्काचा पत्ताः ३०२ नाहर बिझनेस सेंटर, चांदिवली, मुंबई - ४०००७२.
नोंद. ईमेलः ganesh.remani@nliten.in
विक्रीच्या कारणाकरिता ईमेल : liqshreehanumantexfab@gmail.com
संपर्क क्र.: +९१ ९९६७५ ०००१०

# आझम खानच्या जामिनावर आज सुनावणी

इलाहाबाद

**संपत्ती** हस्तगत करून जौहर विद्यापीठात विलीन केल्याप्रकरणी २८ महिन्यांपासून जेलमध्ये असलेले समाजवादी पक्षाचे नेते आझम खान यांच्या जामीन याचिकेवर इलाहाबाद हायकोर्टात गुरुवारी दुपारी ३.३० वाजताच्या सुमारास पुन्हा सुनावणी होणार आहे.

## वसई -विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती (ई) नालासोपारा**

जा.क्र/वविशम/प्रसई/तलाव/६५९/२०२२
दिनांकः- ०४/०५/२०२२

**जाहिर ई-निविदा सुचना**

वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील **मालई तलाव** मत्स्यसंवर्धनकामी ठेका पद्धतीने देणेकामी दि. ०१/०६/२०२२ ते दि. ३१/०५/२०२४ (२ वर्षे) या कालावधीकरिता खालील बाबींसाठी संबंधित निविदाधारकाकडून ई-निविदा महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून मागविण्यात येत आहेत. सदर कामी निविदा फॉर्म http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईट) उपलब्ध आहेत. सदर निविदा धारकांनी त्यांच्या निविदा दि. ०५/०५/२०२२ ते दि.१३/०५/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत ई टेंडरिंग पध्दतीने सादर कराव्यात. सदरच्या निविदा दि. १७/०५/२०२२ रोजी उघडण्यात येतील. अटी व शर्ती निविदा प्रपत्रात नमुद करण्यात आल्या आहेत. याकामी आलेल्या निविदांपैकी कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कोरी निविदा फॉर्म फी रक्कम रुपये | इसारा रक्कम रुपये | अपेक्षित रक्कम रुपये (२ वर्षांकरिता) | मुदत कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील **मालई** मत्स्यसंवर्धनकामी ठेका पद्धतीने देणेबाबत | १०००/- + १८%GST | ७,३९७/- | ७,३९,६९३/- | दि. ०१/०६/२०२२ ते दि. ०१/०५/२०२४ (२ वर्ष) |

Submission - अंतिम दि.१३/०५/२०२२ दुपारी ३.०० वा. पर्यंत.
Opening - दि. १७/०५/२०२२
**टिप :-** निविदेसंबंधी सविस्तर माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईट) उपलब्ध आहेत.

**सही /-**
**उप-आयुक्त (उ.व.सं.व.वृ.प्रा.)**
**प्रभाग समिती (ई) नालासोपारा**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# मिलिंद इंगळे यांना मातृशोक

मुंबई

**प्रसिद्ध** गायक संगीतकार मिलिंद इंगळे यांची आई शुभदा इंगळे यांचे काल मुंबईतील राहत्या घरी वृध्दापकाळाने निधन झाले. त्या ८४ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात मुलगा गायक संगीतकार मिलिंद इंगळे, सून मानसी इंगळे, नातू म्युझिक प्रोड्युसर सुरेल इंगळे असा परिवार आहे. त्यांचे वडिल ज्येष्ठ शास्त्रीय गायक ग्वाल्हेर घराण्याचे प्रतिनिधीत्व करणारे पंडित माधव इंगळे यांचेसुद्धा सहा महिन्यापूर्वी वृध्दापकाळाने निधन झाले. त्या मुळच्या पेण येथील देव घराण्यातील होत्या.

# रेल्वेखाली झोकून एकाची आत्महत्या

जळगाव

**कोणालाही** काही न सांगता घरातून निघून गेलेल्या व्यक्तीने धावत्या रेल्वेखाली झोकून देत आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. मात्र, आत्महत्याचे कारण समोर आलेले नाही. योगेश रमाकांत वाणी (४७) असे मृत व्यक्तीचे नाव असून त्यांनी आज सकाळी नळाला पाणी आल्याने घरी पाणी भरले. त्यानंतर ते कोणालाही काही न सांगता घरातून बाहेर पडले. असोदा रेल्वेगेटजवळील अपलाईन वरील धावत्या रेल्वेखाली सकाळी १०.१५ झोकून देत आत्महत्या केली.

## बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम

(बृहन्मुंबई महानगरपालिका)

पात्रताधारक कंत्राटदार ज्यांना आवश्यक अनुभव / तसेच इतर शासकीय आणि निमशासकीय आस्थापनांमध्ये जे उचित श्रेणी आणि वर्गवारी मध्ये नोंदणीकृत आहेत अशा कंत्राटदारांकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

सर्व स्थापत्य आणि विद्युत कामांसंबंधित निविदा ज्यांची किंमत रु. ३.०० लाखांपेक्षा जास्त आहे अशांसाठी बी.ई.एस.टी. उपक्रमाने एन्.आय्.सी. – टेंडरींग ऑनलाईन पद्धत स्वीकारली आहे. निविदिकारांनी निविदा घेताना / मांडताना (भरतेवेळी) सदरहू ई–टेंडरींग ऑनलाईन पद्धतीच अनुसरणे आवश्यक आहे.

**खालील कामांच्या अंमलबजावणीकरिता निविदा मागविण्यात येत आहेत**

| Sr. No. | Tender No | Description of work | Estimated Cost (Rs.) | Earnest Money (Rs.) | Cost of Tender with GST @ 18% (9% CGST + 9% SGST) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | Cost of Tender | 18% GST | Total |
| 1 | AGM(C)/ C3/ 43 /2022-23 | Reinstatement of cable trenches in private premises at various places in Mumbai City Limits (2022 - 2023). | 3830000.00 | 30000.00 | 2000.00 | 360.00 | 2360.00 |
| 2 | AGM(C)/ C5/ 44(R1) / 2022-23 | Providing modular furniture and internal painting along with allied civil works of CECC office on third floor of Annex Building at Colaba Bus Depot. | 3800422.00 | 30000.00 | 2000.00 | 360.00 | 2360.00 |
| 3 | AGM(C)/ C3/ 45 /2022-23 | Dismantling, lowering existing structural steel SCADA towers provided on the terrace of various locations under the Building department (South) and transporting the same at Oshiwara Scarp yard. | 747881.00 | 10000.00 | 500.00 | 90.00 | 590.00 |
| 4 | AGM(C)/ C3/ 46 /2022-23 | Closing the opening of Transformer Bay of Simplex mill and Tardeo Receiving Sub -Station. | 680329.00 | 10000.00 | 500.00 | 90.00 | 590.00 |
| 5 | AGM(C)/ C4/ 47 /2022-23 | Cleaning of sewer, waste, storm water lines/ open drains etc. at Backbay Bus Depot and various premises under the jurisdiction of Colaba and Backbay Bus Depot (2022-2025). | 594162.00 | 10000.00 | 500.00 | 90.00 | 590.00 |
| 6 | AGM(C)/ C4/ 48 /2022-23 | Operation of water punp at Veej Bhavan RSS cum Officers' Quarters at Backbay (2022-2025). | 564102.00 | 10000.00 | 500.00 | 90.00 | 590.00 |
| 7 | AGM(C)/ C4/ 49 /2022-23 | Operation of water pump at Backbay Bus Depot (2022-2025). | 564102.00 | 10000.00 | 500.00 | 90.00 | 590.00 |
| 8 | AGM(C)/ C4/ 50 /2022-23 | Cleaning of server, waste, storm water lines/ open drains etc. at Colaba Bus Depot (2022-2025). | 552341.00 | 10000.00 | 500.00 | 90.00 | 590.00 |
| 9 | AGM(C)/ C3/ 51 /2022-23 | Civil works for replacement of 11 kv 350 MV VCB Bus Section No.1 at ground floor of Prabhadevi Receiving substation at Prabhadevi, Worli. | 414837.00 | 8000.00 | 300.00 | 54.00 | 354.00 |
| 10 | AGM(C)/ C4/ 52 /2022-23 | Operation of water pump at Dindoshi Staff & Officers' Quarters at Goregaon (East). | 363598.00 | 8000.00 | 300.00 | 54.00 | 354.00 |
| 11 | AGM(C)/ E/ 53 /2022-23 | Carrying out allied Electrical works for proposed new location of Bus Body Repair Bay & repairing scaffolding below podium at Kurla Bus Depot. | 314360.00 | 8000.00 | 300.00 | 54.00 | 3s4.00 |
| 12 | AGM(C)/ C3/ 54 /2022-23 | Construction of remaining work of East side compound wall for the proposed Bus Station plot at Oshiwara, Goregaon (West). | 717147.00 | 10000.00 | 500.00 | 90.00 | 590.00 |

Tender documents are available on the website **https://mahatenders.gov.in.** Tenders shall be submitted online as per time schedule tabulated hereunder.

| | For Tender Sr. No. 1 to 12 |
|---|---|
| e-Tender Publishing Date | On 05.05.2022 at 9.00 A.M. |
| Bid Submission Closing Date | On 19.05.2022 Upto 9.00 A.M. |
| Bid Opening Date | On 23.05.2022 at 3.00 P.M. |

रिकाम्या निविदा प्रती, इसारा ठेव रक्कम इत्यादींची किंमत कोष/लेखा विभागात स्वीकारण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.
कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा उपक्रमाचा हक्क अबाधित राहील. निविदा उघडण्याची तारीख पुढे ढकलण्याबाबतचा उपक्रमाचा हक्क देखील अबाधित राहील.

**ज.सं.अ./समव्य(स्था)/१८/२०२२** **महाव्यवस्थापक**

## महावितरण — विज बंदबाबत जाहीर निवेदन

कल्याण पश्चिम विभागातील सर्व विज ग्राहकांना कळविण्यात येते की, २२ केव्ही स्पोर्ट कॉम्पलेक्स उपकेंद्रातुन निघणाऱ्या २२ केव्ही अन्नपुर्णा वाहिनीवर तसेच १००/२२ केव्ही मोहने उच्चदाब उपकेंद्रातुन निघणाऱ्या २२ केव्ही मोहने १२ वाहिनीवर पावसाळ्यापुर्वी देखभाल व दुरूस्तीच्या आणि इतर कामासाठी खाली नमुद केलेल्या भागाचा विज पुरवठा बंद राहील याची कृपया नोंद घ्यावी. ग्राहकांच्या होणाऱ्या गैरसोईबद्दल महावितरण कंपनी दिलगीर आहे.

| अनु. क्र. | उपकेंद्र | फिडर | दिनांक | वेळ | भागाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | २२ केव्ही स्पोर्ट कॉम्पलेक्स | अन्नपुर्णा | ०५.०५.२०२२ | ०९.०० ते १३.०० | रमाबाई आंबेडकरनगर, आधारवाडी चौक, संभाजीनगर, पवारनीचा पाडा, गायकरपाडा, रॉयल रेसिडेन्सी, इंद्रप्रस्थ, मेघ मल्हार, नम्रता हाईटस, गजानंद महाराज, गणेश गौरी, स्कॉय व्हिला, मंगेशीधाम, गोल्डनपार्क, न्यु मनिषा नगर, बेतुरकरपाडा, स्वानंदनगर, भोईर कॉलनी, धोबीघाट, काळा तलाव, मच्छीमार सोसायटी, ठाणकरपाडा, हिना पार्क, शंकेश्वर दर्शन, पंचमुखी, राममंदीर, बालगोपाल रेसिडेन्सी, जुना मनिषा नगर. |
| २ | १००/२२ केव्ही मोहने | मोहने १२ | ०६.०५.२०२२ | १०.०० ते १६.०० | मोहनेगाव, गाळेगाव, जेतवन नगर, फुलेनगर, यादवनगर, सहकारनगर, बाजारपेठ, आर.एस. टेकडी, एनआरसी कॉलनी, धम्मदीपनगर. |

**कार्यकारी अभियंता कल्याण पश्चिम विभाग**

## बृहन्मुंबई महानगरपालिका

**बा.य.ल.नायर धर्मादाय रुग्णालय, आहार उप समिती, डॉ. ए. एल. नायर रोड, मुंबई - ४०० ००८.**

**ई-प्रापण निविदा सूचना**

**बीवायएल/डाएट/एससी/IV/एससीएच/पीओः २०२२-२०२३**

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे (बृमुंमुपा)आयुक्त ऑनलाईन ई-निविदा मागवित आहेत. निविदा प्रत बृमुंमपाच्या पोर्टल (Http://www.portal.mcgm.gov.in) वरून "ई-प्रापण" विभागामधून डाऊनलोड करता येईल. सर्व इच्छुक विक्रेत्यांनी, ते आधीच बृमुंमपाकडे नोंदणीकृत असोत किंवा नसोत, ई-निविदा प्रक्रियेकरिता आणि ऑनलाईन बोली प्रक्रियेमध्ये भाग घेण्याकरिता बृमुंमपा सोबत नोंदणीकृत होणे अनिवार्य आहे. त्याचे तपशील वरील उल्लेखित पोर्टलवर "निविदा" अंतर्गत उपलब्ध आहेत.

नोंदणीकरणाकरिता, डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्राकरिता नावनोंदणीकरिता आणि वापरकर्ता पुस्तिकेकरिता, कृपया ई-निविदा टॅब मध्ये देण्यात आलेल्या संबंधित लिंकचा संदर्भ घ्यावा. प्रमाणन प्राधिकरणाचे नियंत्रक यांच्याद्वारे परवाना दिलेल्या सेफ्स क्रिप्ट, आयडीआरबीटी, नॅशनल इन्फोरमॅटिक्स सेंटर, टीसीएस, कस्टम्स, एमटीएनएल, जीएनएफसी आणि ई मुद्रा सीए यांसारख्या प्रमाणन प्राधिकरणांपैकी (सीए) कोणत्याही एकाकडून विक्रेते डिजिटल स्वाक्षरी प्राप्त करू शकतात.

तांत्रिक आणि वाणिज्य बोली खाली नमूद केलेल्या नियत दिनांक आणि वेळेपर्यंत ऑनलाईन सादर कराव्या.

| अ. क्र. | तपशील | बोली ऑनलाईन डाऊनलोड सुरु करण्याकरिता दिनांक आणि वेळ | ऑनलाईन बोली सादरीकरणाचा अंतिम/नियत दिनांक आणि वेळ | इसारा रक्कम अनामत (ई.एम.डी.) (रुपयांमध्ये) | ई-निविदा शूल्क |
|---|---|---|---|---|---|
| १ | शेड्यू. क्र. बीवायएल/डाएट/एससी/III/एससीएच/पीओः **२०२२-२३** नुसार लोकवन गव्हाचे पीठ आणि बासमती तांदूळ पुरवठा करण्याकरिता निविदा. **(बोली क्र. ७२०००३१४१६)** | **०५.०५.२०२२** रोजी ११.०० वाजता | **१३.०५.२०२२** रोजी ३.०० वाजेपर्यंत | १,००,०००/- | रु. १०,४००/- + १८% जीएसटी |
| २ | शेड्यू. क्र. बीवायएल/डाएट/एससी/IV/एससीएच/पीओः **२०२२-२३** नुसार ब्रेड (संपूर्ण गव्हाचे ब्रेड), अंडी आणि सीटीसी चहा पावडरचा पुरवठा करण्याकरिता निविदा. **(बोली क्र. ७२०००३१४१७)** | **०५.०५.२०२२** रोजी ११.०० वाजता | **१३.०५.२०२२** रोजी ३.०० वाजेपर्यंत | १,००,०००/- | रु. १०,४००/- + २.५% सीजीएसटी २.५% एसजीएसटी |
| **टीपः इसारा रक्कम अनामत (ईएमडी) ऑनलाईन भरावयाचा अंतिम दिनांक उपरोल्लेखित नियत दिनांक आणि वेळेस किंवा त्यापूर्वी आहे.** | | | | | |

**निविदाकाराने वर उल्लेखिल्यानुसार निविदा प्रपत्रे डाऊनलोड करण्यापूर्वी प्रत्येक निविदेकरिता 'ई-निविदा शुल्क' (परिपत्रक सीए/एफआरजी/२०, दि. १७.०१.२०२२ नुसार) अधिक १८% जीएसटी (सीजीएसटी=९% आणि एसजीएसटी=९%) ऑनलाईन पेमेन्ट गेटवे द्वारे भरणा करावयास हवे. (परिपत्रक सीए/एफआरटी/१७, दि. २३.१२.२०२१ नुसार दि. २३.१२.२०२१ पासून प्रभावी)**

परिपत्रक क्र. सीए/एफआरडी/I/२२, दि. २०.१०.२०१५ नुसार, निविदाकारांनी ईएमडी फक्त ऑनलाईन भरावी. स्थायी अनामत असलेल्या विक्रेत्यांनी देखील संपूर्ण ईएमडी रक्कम ऑनलाईन भरावयास हवी. ईएमडीचा भरणा करण्याकरिता ई-पेमेन्ट गेटवेसाठी लिंक एसआरएममध्ये देण्यात येईल.

वरीलपैकी कशाच्याही संदर्भात किंवा निविदा किंवा बोली प्रक्रियेशी संदर्भित किंवा संबंधाने, त्यामधील कोणत्याही त्रुटी किंवा चुकीसह, उद्भवलेल्या कोणत्याही प्रकरण किंवा गोष्टीमुळे, किंवा बृमुंमपाद्वारे देण्यात आलेल्या कोणत्याही माहिती किंवा डेटामधील काहीही वगळले गेल्यास, चूक किंवा त्रुटीकरिता बृमुंमपा जबाबदार असणार नाही. महापालिका आयुक्त सर्व किंवा कोणतीही ई-निविदा कोणतेही कारण न दर्शविता कोणत्याही टप्प्यावर फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवीत आहेत.

निविदाकारांनी नोंद घ्यावी की, सदर निविदा सूचनेशी संबंधित पारित केलेले कोणतेही शुद्धीपत्रक फक्त बृमुंमपाच्या पोर्टलवर प्रसिद्ध केले जाईल. स्थानिक वृत्तपत्रामध्ये कोणतेही शुद्धीपत्रक प्रसिद्ध केले जाणार नाही.

बोलीपूर्व सभा निविदेच्या नियत दिनांकास किंवा त्यापूर्वी आयोजित करण्यात येईल. त्याचा वेळ/दिनांक आणि ठिकाण निम्नस्वाक्षरीकारांच्या कार्यालयातून निश्चित करण्यात येईल.

**बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या आदेशानुसार**
**सही/-**
**अधिष्ठाता (नायर) आणि अध्यक्ष,**
आहार उप समिती
**बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय**

पीआरओ/१९३/एडीव्ही/२०२२-२३

**येता कणकण तापाची तपासणी करून घ्या रक्ताची.**

## पनवेल महानगरपालिका

**शहर अभियंता विभाग**
**जाहीर ई-निविदा सूचना**
**दुसरी मागणी (Second Call)**

**निविदा सूचना क्र. पमनपा/बांधकाम/प्रआयो/०५३/२०२२-२३** **दिनांक- ०२/०५/२०२२**

**आयुक्त पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/ निम शासकीय (State Government, Central Government, Government undertaking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बाबन्याय दर पद्धतीनुसार (बी-२) जाहीर ई-निविदा मागवित आहेत.**

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (without GST) |
|---|---|---|---|
| 1 | **PMC/CE/PMAY/ / 2022-23** | Appointment of an Agency to Design, Develop, Implement, Provide Software, Carry out Draw, Physical Scrutiny of Documents, Necessary Communications, Deployment & Configuration of Post Lottery Software Application for Successful and Waitlisted Beneficiaries And Services For Allotment of Housing Schemes Under Pradhanmantri Aawas Yojana in Panvel Municipal Corporation. | **Rs.1,58,00,000/-** |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती महाराष्ट्र शासनाच्या **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर **दि. ०५/०५/२०२२** रोजी प्रसिध्द करण्यात येईल. निविदा ०५/०५/२०२२ ते १९/०५/२०२२ ह्या कालावधीत संकेतस्थळावर उपलब्ध असेल. निविदा सादर करण्याची शेवटची दिनांक १९/०५/२०२२ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(तृप्ती सांडभोर)**
**अतिरिक्त आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका.**

## पनवेल महानगरपालिका

**शहर अभियंता विभाग**
**जाहीर ई-निविदा सूचना**
**दुसरी मागणी (Second Call)**

**निविदा सूचना क्र. पमनपा/बांधकाम/प्रआयो/०५३/२०२२-२३** **दिनांक- ०२/०५/२०२२**

**Commissioner, Panvel Municipal Corporation is inviting Item rate E-Tenders (B-2) for below mentioned work from eligible and experienced contractors of State Government, Central Government, Government undertaking.**

| Sr. No. | Tender No. | Name of the Work | Cost of Tender (without GST) |
|---|---|---|---|
| 1 | **PMC/CE/PMAY/ / 2022-23** | Appointment of an Agency to Design, Develop, Implement, Provide Software, Carry out Draw, Physical Scrutiny of Documents, Necessary Communications, Deployment & Configuration of Post Lottery Software Application for Successful and Waitlisted Beneficiaries And Services For Allotment of Housing Schemes Under Pradhanmantri Aawas Yojana in Panvel Municipal Corporation. | **Rs.1,58,00,000/-** |

Interested tenderers should note that detailed information and tender documents are available on Maharashtra Govt website **"htpp://mahatenders.gov.in" from 05/05/2022 to 19/05/2022.** Last date of submission of tender by way of E-tendering will be 19/05/2022 up to 17 Hrs.

**sd/-**
**(Trupti Sandbhor)**
**Add. Commissioner**
**Panvel Municipal Corporation.**

नवाकाळ
चंदेरी च्वींगम
मुंबई | गुरुवार ५ मे, २०२२
web:http://navakal.in | e-mail: navakal.1923@gmail.com

# भावनात्मक रोल करायला आवडतात



'फॅन' या सिनेमामुळे प्रकाशझोतात आलेली अभिनेत्री **श्रीया पिळगावकर** हिला 'मिर्झापूर'मुळे तुफान लोकप्रियता मिळाली. सध्या ती 'गिल्टी हाऊस' या वेबसीरिजमध्ये वकिलाच्या भूमिकेमुळे पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. आपल्याला सर्वच प्रकारच्या भूमिका करायच्यात असे सांगणाऱ्या श्रीयाशी केलेली बातचीत.

**श्रीया, 'गिल्टी माइंड्स'मध्ये काम करणं किती कठीण होतं?**

- फारसं कठीण नव्हतं, पण वकिलाची ही भूमिका थोडी किचकट नक्की होती. कोर्टात एक मजबूत महिला म्हणून नावाजलेली ही स्त्री तिच्या खाजगी जीवनात कमजोर दाखवायची होती. हे जरा कठीण वाटलं. पण म्हणूनच ही व्यक्तिरेखा करताना खूप मजा आली. आतापर्यंत अशी भूमिका आणि मुळातच वकिलाची भूमिका मी कधी केली नव्हती. म्हणून तयारीसाठी मी माझ्या काही वकिल मित्रांना भेटले. उच्च न्यायालयातही जाऊन आले. अशा वेगवेगळ्या भूमिका करूनच एखादी अभिनेत्री मजबूत होत असते.

**कोर्टात वकिलाची भूमिका करायची अशी कधी इच्छा झाली होती?**

- नाही. एखादी विशिष्ट भूमिका करायची अशी मनात मी कधीच इच्छा धरली नाही. पण कोर्ट ड्रामा असलेले चित्रपट, नाटके पाहायला मला खूप आवडते. मला सगळ्याच प्रकारचे रोल करायची भूक तेव्हाही होती आणि आताही आहे. मला भावनात्मक भूमिका करायला आवडतात. या वेबसीरिजमध्येही त्या वकील महिलेची भावनात्मक बाजू पाहण्याची संधी मला मिळाली.

**या भूमिकेसाठी काही खास तयारी केलीस?**

- तशी तयारी, अभ्यास वगैरे करण्याची जास्त गरज लागलीच नाही. कारण आमचे दिग्दर्शक मुळात वकिलांच्या कुटुंबातलेच आहेत. त्यामुळे या सीरिजमध्ये दाखवल्या जाणाऱ्या प्रकरणांवर त्यांनी चांगला रिसर्च केला आहे. या सीरिजमध्ये अनेक मुद्यांना त्यांनी स्पर्श केला आहे. हा एक कोर्ट ड्रामा तर आहेच, पण यात विनोदी प्रसंगही भरपूर आहेत.

**सीरिजमध्ये तुला कोणते प्रकरण भावले?**

- या वेबसीरिजमध्ये दोन प्रकरणे दाखवली आहेत. पटकथेत ती वाचून मी चकितच झाले. एका प्रकरणात मोबाईलच्या आहारी गेलेला एक विद्यार्थी आत्महत्या करतो. यात कुणाला दोषी ठरवायचे? या प्रकरणात मला विद्यार्थ्याबाबत सहानुभूती वाटली. दुसरे प्रकरण पाण्याचा अधिकार. ते वाचून मला रडूच आले. आजघडीचे हे खूप मोठे वास्तव आहे.

**ही भूमिका सर्वात कठीण आहे असे तुला वाटते का?**

- हो. निश्चितच. ही एक अशी व्यक्तिरेखा आहे, जी जीवनात मला प्रथमच करायला मिळाली आहे. या आधीच्या कुठल्याही भूमिकेशी या व्यक्तिरेखेशी करताच येणार नाही असे मला वाटते.



## विराजस - शिवानी अडकले लग्नबंधनात!

बॉलीवूडप्रमाणे सध्या मराठी मनोरंजन विश्वात लग्नाचे वारे वाहत आहेत. अभिनेता विराजस कुलकर्णी आणि अभिनेत्री शिवानी रांगोळे या सेलिब्रिटी कपलने अक्षय तृतीयाच्या मुहूर्तावर लग्नगाठ बांधली आहे. सोशल मीडियावर त्यांनी आपल्या लग्नाचे फोटो शेअर केले आहेत. अत्यंत पारंपारिक पद्धतीने पुण्यामध्ये त्यांचा हा लग्नसोहळा पार पडला. यावेळी त्यांच्या घरातील सदस्य आणि मोजकेच कलाकार उपस्थित होते. त्यांच्या लग्नाचे फोटो व्हायरल होत असून या फोटोवर चाहत्यांकडून तसेच कलाकारांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## राणादा - पाठक बाईने केला साखरपुडा

### खऱ्या आयुष्यात होणार पती-पत्नी



'तुझ्यात जीव रंगला' मालिकेतून घराघरांत पोहोचलेल्या राणादा आणि पाठकबाई आता खऱ्या आयुष्यात पती-पत्नी होणार आहेत. अभिनेता हार्दिक जोशी आणि अक्षया देवधर लवकरच लग्नाच्या गाठीत अडकणार आहेत. अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर दोघांनी साखरपुडा केला. दोघांनी साखरपुड्याचे फोटो सोशल मीडियावर शेअर करत चाहत्यांना सुखद धक्काच दिला आहे. या सोहळ्यामधील एक व्हिडिओ देखील व्हायरल होत आहे यामध्ये हार्दिक गुडघ्यावर बसून अक्षयाला प्रपोज करत अंगठी घालताना दिसतोय. तर अक्षया गाणी गात त्याला अंगठी घालताना दिसतेय.

# व्याजदर वाढताहेत, ठेवींवरीलही

**भारतीय रिझर्व्ह बँकेने अपेक्षेप्रमाणे प्रमुख व्याजदर स्थिर ठेवले. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या द्वैमासिक पतधोरण आढावा जाहीर करताना रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी महागाई नियंत्रण आणि विकास दर वाढ याला प्राधान्य असल्याचे स्पष्ट करत तूर्त व्याजदर न वाढविण्याचे स्पष्ट केले. भारताने अद्यापही अर्थव्यवस्थेत सुधार नसल्याने व्याजदरात बदल केला नाही. रशिया-युक्रेन युद्ध तसेच येणारा मान्सून याबाबतच्या अनिश्चिततेतून हा निर्णय घेतला गेला. असे असले तरी गेल्या काही दिवसात कर्जावरील व्याजदरात वाढ होत आहे. गृह आदी कर्जे आता महागडी ठरत आहेत.**



अनेक खासगी बँकांनी त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. कोरोना-लॉकडाऊननंतर कर्जाला नसलेल्या मागणीमुळे कर्जाचे व्याजदर गेल्या अनेक दशकांच्या किमान स्तरावर आणून ठेवण्यात आले होते. सध्याही ते एकेरी आकड्यातच आहेत. मात्र गेल्याच आठवड्यात काही बँकांनी त्यांच्या विविध मुदतीच्या ठेवींवरील व्याजदरही वाढवले. ही दिलासाजनक बाब आहे. वाढत्या महागाईच्या आणि उत्पन्न कमी होण्याच्या वातावरणात ही सकारात्मक पाऊल मानले जाते. जोखीममुक्त बचतीकडे कल असलेल्यांना मुदत ठेवी हा एक उत्तम पर्याय आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांसाठी हा विषय जिव्हाळ्याचा आहे.

भारतात बँकांमधील मुदत ठेवी किंवा एफडी ही मध्यमवर्गीय नागरिकांसाठी अल्प गुंतवणुकीची लोकप्रिय पद्धती आहे. बँक एफडी ज्येष्ठ नागरिकांमध्ये आणि ज्यांना धोकादायक मालमत्तेत गुंतवणूक करायची नाही आणि त्यांच्या गुंतवणुकीसाठी सुरक्षित आणि सुरक्षित परतावा हवा आहे अशांमध्येही लोकप्रिय आहे. एफडी स्थिर आणि हमी दर परतावा देतात.

अलीकडे, एचडीएफसी बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, कोटक महिंद्रा बँक, आयसीआयसीआय बँक आणि इतरांसह खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी विविध ठेवींसाठी त्यांच्या एफडी व्याजदरात वाढ केली आहे.

## खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकेचे काही नवीनतम एफडी दर येथे आहेत

### स्टेट बँक ऑफ इंडिया

स्टेट बँकेने २ कोटी रुपयांपेक्षा कमी ठेवींवर १० मार्च २०२२ पासून एफडी व्याजदरात वाढ केली आहे.

७ दिवस ते १४ दिवस : सामान्यांसाठी - २.९० टक्के; ज्येष्ठ नागरिकांसाठी - ३.४० टक्के (हे ३० ते ४५ दिवसांसाठीही लागू आहे.)

४६ दिवस ते ६० दिवस : सामान्यांसाठी - ३.९० टक्के; ज्येष्ठ नागरिकांसाठी - ४.४० टक्के (९१ ते १२० दिवसांपर्यंत लागू)

६ महिने १ दिवस ते ९ महिने : सामान्यांसाठी - ४.४० टक्के; ज्येष्ठ नागरिकांसाठी - ४.९० टक्के (१ वर्ष १ दिवस ते २ वर्षेपर्यंत)

### एचडीएफसी बँक

६ एप्रिलपासून लागू होणाऱ्या २ कोटी रुपयांपेक्षा कमी ठेवींसाठी एचडीएफसी बँकेच्या मुदत ठेवींच्या व्याजदरातही वाढ करण्यात आली आहे.

७ दिवस ते १४ दिवस व १५ दिवस ते २९ दिवस : सामान्यांसाठी - २.५० टक्के; ज्येष्ठांसाठी - ३.०० टक्के

३० दिवस ते ४५ दिवस, ४६ ते ६० आणि ६१ ते ९० दिवस : सामान्यांसाठी - ३.०० टक्के; ज्येष्ठांसाठी - ३.५० टक्के




### आयसीआयसीआय बँक

बँकेने २ कोटी रुपयांपेक्षा जास्त आणि ५ कोटी रुपयांपेक्षा कमी ठेवींसाठी व्याजदर वाढवले आहेत. याची अंमलबजावणी २८ एप्रिलपासून लागू झाली आहे.

७ दिवस ते १४ दिवस व १५ ते २९ दिवस : सामान्यांसाठी - २.५० टक्के; ज्येष्ठांसाठी - २.५० टक्के

३० दिवस ते ४५ दिवस व ४६ ते ६० दिवस : सामान्यांसाठी - २.७५ टक्के; ज्येष्ठांसाठी - २.७५ टक्के

संपादन - विरेंद्र तळेगांवकर




**साडे तीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या यंदाच्या अक्षय्य तृतीयेला सराफा बाजारात सोने व चांदीसाठी असलेली ग्राहकांची खरेदी मागणी वाढली होती. सोन्याच्या एका तोळ्यासाठीचा ५१ हजाराच्या नजीक राहणारा दर मौल्यवान धातूच्या मागणीच्या पथ्यावर पडला.**

# सोने-चांदीच्या मागणीची चमक, मौल्यवान धातूची अक्षय्य विक्री

**विशेष** म्हणजे कोरोना-लॉकडाऊननंतर पूर्ण क्षमतेने हा व्यवसाय पूर्वपदावर आला आहे. त्यानंतरचा हा पहिलाच व मोठा मुहूर्त ठरला. मोठ्या ज्वेलर्सबरोबरच लहान दागिने विक्रेत्यांनीही त्यांचे गेल्या काही वर्षातील नुकसान भरून काढण्याचा प्रयत्न केला.

सोन्याच्या दरात गेल्या काही महिन्यांपासून घसरण सुरू आहे किंवा ते दर स्थिर तरी आहेत. गेल्या दोन वर्षांच्या विपरीत यावेळी सोन्याची वाढीव विक्री आणि अनिवार्य हॉलमार्किंगमुळे या उद्योगातील बहुसंख्य भाग असलेल्या छोट्या ज्वेलर्सना हायसे झाले. या उद्योगाचा प्रारंभिक अंदाज २०१९ च्या तुलनेत विक्रीत २० टक्क्यांहून अधिक वाढ दर्शवते. यंदाची सोने-चांदीची विक्री ही कोविड कालावधीपेक्षा २४ टक्के अधिक असल्याची आकडेवारी समोर आली आहे. गेल्या १० दिवसात सोन्याच्या दरात प्रति १० ग्रॅम ४ हजार रुपयांची घसरण झाल्याने खरेदीलाही चालना मिळाल्याचे मानले जाते.


भारतीयांमध्ये अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सोने खरेदी करण्याची परंपरा आहे. ते समृद्धी आणि भाग्य आणते असे मानले जाते. गेल्या काही वर्षांत साथआजाराने ग्राहकांना घरातच राहण्यास भाग पाडले होते. या दरम्यान ऑनलाईन विक्रीत हालचाल नोंदली गेली असली तरी ती एकूण विक्रीच्या अवघी १५ ते २० टक्के आहे. परंपरा म्हणून सोन्याची खरेदी हा अक्षय्य तृतीयेचा अविभाज्य भाग आहे. सध्या सुरू असलेल्या लग्नसराईच्या हंगामामुळे बाजारात सकारात्मक भावना निर्माण होण्याची अपेक्षा आहे. दोन वर्षांच्या पूर्ण किंवा आंशिक लॉकडाऊननंतर या वर्षी अनेक सराफा व्यावसायिकांची दालने १०० टक्के कार्यरत होती. यंदाच्या अक्षय तृतीयेला दागिने आणि सोन्याच्या नाण्यांना खरेदीदारांकडून मागणी होती. खरेदी केलेले मौल्यवान धातूचे प्रमाण कमी असले तरी ग्राहक काही प्रमाणात खरेदी करत होते. सोन्याचे दर गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढले आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा दर प्रति औंस १,८५४ डॉलरच्या आसपास आहे. मागील वर्षीच्या अक्षय्य तृतीयेला तो १,८३५ डॉलर होता. तर २०२० मध्ये तो १,७१५ डॉलर होता.

सोने खरेदीमध्ये खूप गतीशीलता असते. गेल्या वर्षी सोन्याच्या दरात फारसा फरक पडला नाही. मात्र गेल्या काही दिवसांत किमतीत झालेल्या घसरणीचा सकारात्मक परिणाम यंदाच्या मुहूर्ताला दिसला. रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर दर प्रति औंस २,००० डॉलरवर होता आणि एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत तो १,९०० डॉलरवर होता. उच्चांकी डॉलर निर्देशांक आणि अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हकडून प्रमुख व्याज दरात वाढ होण्याची अपेक्षा यामुळे सोन्याच्या किमतीत घसरण आहे. मात्र हे अल्पकालावधीसाठी असू शकते.



तसेच व्याजदर वाढीची घोषणा झाल्यानंतर सोन्याचे भाव वाढण्याची भीती आहे. एमसीएक्सच्या मंचावर जूनमधील सोन्याच्या फ्युचर्सच्या किमती प्रति १० ग्रॅम ५१,७०० रुपयांच्या आसपास आहेत. एका वर्षापूर्वीच्या तुलनेत त्यात यंदा ४ हजार रुपयांची वाढ झाली आहे. साथीच्या आजाराची भीती कमी झाल्यामुळे तसेच विवाह सोहळ्यांना पूर्वीचा थाट पुन्हा मिळाल्यामुळे दागिन्यांची खरेदी वाढली आहे. गेल्या दोन वर्षांत मोठे ज्वेलर्स ऑनलाईन विक्री आणि सवलतींद्वारे ग्राहकांना आकर्षित करू शकले. मात्र यावर्षी छोट्या सराफ दुकानदारांना सर्वाधिक फटका बसला. यंदाचा अक्षय तृतीयेनंतरचा लग्नाचा मुहूर्त संपल्यानंतर वर्षअखेरपूर्वी दसरा व दिवाळी दरम्यान सोन्याचे दर पुन्हा वाढण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर ग्राहकांकडूनही मागणी नोंदली जाण्याची चिन्हे आहेत.

# नवाकाळ शब्दकोडे-१६६



**आडवे शब्द –** १. जहाल विष ४. संधीला मुकलेला, डावलला गेलेला ६. नसता अधिकार गाजवणारी स्त्री १०. फालतू, टुकार ११. भांडकुदळ महिला १२. पसरट बुडाची टोपली १४. कंदर्प, कांदा १५. टेंभा, मशाल १७. राष्ट्र १९. कुवत, मर्यादा २०. भेषज, औषध २१. एकाग्र नजर २३. दहा, दहाचा समुदाय २४. केस, देवयानीचा मित्र २६. उत्पन्न, आय २७. महाभारतात विराट राजाचा मेव्हणा २९. पुढची बाजू, आघाडी ३०. रेशमाचा एक प्रकार ३२. हातातले काम संपवणे ३५. गाढव, गर्दभ ३७. सवंगडी, पार्टनर ३८. पूर्व दिशा ४०. सावळा गोंधळ ४३. योग्य, बरोबर ४४. आच्छादन ४६. उलट्या तळहाताचा प्रहार ४७. पुरुष, मनुष्य जन्म ४८. गळा ४९. पडसे ५२. चार चाकी वाहनप्रकार ५४. पातक, वाईट कृत्य ५५. वेदांची संख्या ५६. जगदंबा, पार्वती ५७. ताबडतोब ६०. घर, गृह ६२. गहू, जव, तांदूळ यांचे सत्त्व ६४. श्रीकृष्ण, बंगालमधली मोठी नदी ६६. चिडखोर ६७. आटवलेल्या दुधाचा घट्ट गोळा ६९. ममता, वात्सल्य ७०. नाशवंत ७२. एका संख्येतून दुसरी संख्या कमी करणे ७४. सत्यनारायणाच्या कथेतील साधु वाण्याची मुलगी ७५. पात्रता ७६. बिनमिठाचा स्वयपाक ७७. शान, वैभव ७९. योगदान ८०. नवरदेव, दैवी देणगी ८१. पुराव्यानिशी सिद्ध केलेले ८८. न बोलणे, अबोला ८३. व्रत ८५. चौदावे नक्षत्र, मुलींचे एक नाव ८६. वेदना, आजारपण ८८. पुष्पहार, मण्यांचा हार ८९. प्रहार ९१. इंग्रजांविरुद्ध भारतीयांचे मोठे आंदोलन ९३. छोटेमोठे, किरकोळ ९७. मदत, सहाय्य ९८. चोळीचे कापड, टेबलाचा कप्पा ९९. जंगल, अरण्य १००. चंचल, अस्थिर धोरण १०१. भीती, धास्ती १०२. सुंठीचे पूर्वरूप १०३. भरतीची वेळ १०४. शिंप्याचे माप घेण्याचे साधन १०५. वृक्ष, अरण्य, बाग १०६. त्वरित १०८. कीर्तन करणारा १०९. जाड दोरी ११०. मीठ १११. वन्य, रानटी

**उभे शब्द –**

१. अधिकार २. प्रिय ३. धोशा, पाठपुरावा ४. बंगालचे जुने नाव ५. भेग, चीर ६. पुढे जाणे, वाटचाल ७. अर्धचंद्र ८. कार्यक्रमाची सांगता ९. खतरुड १०. भूतचेष्टा, पिशाच्याच्या लीला १३. अपेक्षेपेक्षा कमी वेळात १६. गहिवर १८. गाडा, कारभार २२. केर, धूळ २३. विश्वासघात करणारा २५. छाती २८. कौशल्ये ३१. सत्यनारायणाच्या पूजेचे सर्व सामान या पटीत घेतात ३२. नक्षत्र ३३. दया ३४. अडचण ३६. सामूहिक प्रार्थनेचा प्रकार ३७. अवलंबन ३८. जनावर, पशू ३९. पैसेवाला, धनाढ्य ४१. फणसाचा प्रकार ४२. छोटा फोड ४३. खरबरीत ४४. रीघ, दाटी ४५. नित्य, नेहमी ४८. कापरे ४९. कापसाचे बी ५०. दयेची याचना करणे ५१. उपजत आवड ५३. कुमक ५४. पुस्तकाचे पृष्ठ ५५. फाजील, वात्रट ५८. प्रेमळ संबंध, खेळीमेळी ५९. हनुमानाचे शस्त्र ६१. घमघमाट ६२. तंबाखूचे चूर्ण, आता हे व्यसन कमी झालेय ६३. अतिशय मोठा धनलाभ ६५. आनंद ६६. कब्जा, नियंत्रण ६८. राबता, उठबस ७१. प्रजा ७३. ताकीद, समज ७६. ढोबळ माहितीवर केलेला साधारण अंदाज ७८. कोर्टात केलेला अर्ज ८०. अधाशी, अतृप्त ८१. वाघ, व्याघ्र ८४. स्वच्छ ८६. दुसरा ८७. चण्याच्या डाळीचे पीठ ९०. गुंड, मवाली ९१. मुलींचा नाकातला अलंकार ९२. अपत्य ९४. भूताटकीचा कथित प्रकार ९५. ख्रिस्ती भिक्षुणी ९६. धोतराचा किंवा साडीचा काष्टा ९७. धान्य मोजण्याचे जुने माप (आठ शेर किंवा दोन पायली) १०१. नदीवरचा बांध १०२. ओळ, रांग १०३. बरोबर १०५. अवसान १०६. खांबावर आडवी टाकलेली तुळई १०७. मेंदी •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६५ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. डोईजड ४. ओनामा ६. सफाईदारपणा ११. जोर १२. ठरलेले १४. हूड १६. रहाट १७. कलेवर १९. खतरनाक २०. पाडाव २२. सकवार २४. तपासणी २६. आडदांड २८. राकट २९. दाभण ३१. डोई ३२. खडाजंगी ३५. पारवा ३६. मकबरा ३८. पथिकाश्रम ३९. नीट ४१. कनक ४२. दरारा ४४. भाट ४५. तर ४६. रंजक ४८. क्षती ४९. कप ५२. तलफ ५३. चादर ५४. आस ५५. जनगणना ५६. सवाल ५७. बांबू ५८. खोड ५९. उंदीर ६०. धाकटा ६२. पावक ६४. जंत्री ६५. कांब ६७. पकड ६९. पाठिंबा ७०. भीम ७२. बाहू ७३. नाते ७५. पोळ ७६. लढा ७८. चमचेगिरी ७९. चव्हाटा ८१. अटकर ८३. लकवा ८५. कडा ८७. कोमल ८८. रंगत ९०. हलका ९२. घोटा ९३. कपटा ९५. गर्क ९६. मामी ९७. टच ९९. हरकत १०१. फार १०२. साफ १०३. नवरात्र १०५. मान्य १०६. नाका १०७. अवकळा

**उभे शब्द** : १. डोरले २. जठर ३. डर ४. ओले ५. माहूत ७. फारकत ८. ईहा ९. दाट १०. पकोडा ११. जोकर १३. लेखक १५. डरपोक १८. वऱ्हाड १९. खर २०. पाणीदार २१. वरुण २२. सड २३. वाकडा २५. पाश २६. आई २७. दांभिक २८. रागी ३०. भवानी तलवार ३१. डोलकर ३२. खरारा ३३. जंगी ३४. भिकार ३५. पामर ३६. मकरंद ३७. बदक ३८. पटकन ४०. टरफल ४३. राक्षस ४७. जरब ५०. पगडा ५१. मैना ५२. तसदी ५३. चाबूक ५४. आरव ५५. जडजंबाल ५७. बांधा ५९. उंबराचे फूल ६१. टाप ६२. पाड ६३. कपाळकरंटा ६६. राहू ६८. कमी ७१. मचवा ७२. बारीक ७३. नाचणी ७४. तेव्हा ७५. पाट ७७. ढाल ८०. टाकोटाक ८१. अलक ८२. रग ८४. कटू ८६. डास ८९. तगर ९०. हमी ९१. काटवट ९२. घोरणे ९४. पशू ९६. माफक ९८. चरा १००. तमा १०१. फाका १०२. साव १०४. त्रपा

# भोंगे उतरणार नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहणार

पान १ वरून

कायद्याचे उल्लंघन केले त्यांच्यावर काय कारवाई करतील ते बघायचे आहे. हा विषय एक दिवसाचा नाही. ३६५ दिवस रोज पाच वाजता आम्ही का ऐकायचे?

बुधवारपासून मशिदीच्या भोंग्यांसमोर दुप्पट आवाजाने लाऊडस्पीकरवरुन हनुमान चालिसा लावा, असे आवाहन मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी आपल्या जाहीर सभांमधून देशवासियांसह मनसे कार्यकर्त्यांना केले होते. याबाबत काल रात्री पत्रही ट्विट केले होते. त्यामुळे ठाणे, पुणे, मुंबईसह राज्यातील प्रमुख शहरांत पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला होता. आज अनेक मशिदींनी सकाळी लाऊडस्पीकरवर अजान म्हटले नाही. काही मशिदींनी अजानचा आवाज कमी केला होता. काही ठिकाणी मनसे कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले होते. अशा परिस्थितीत मनसे कार्यकर्त्यांनी आज पहाटे मुंबईच्या मुंबादेवी परिसरातील दर्ग्यासमोर लाऊडस्पीकरवर हनुमान चालिसा वाजवली. पोलिसांना याबाबत माहिती नसल्याने मनसेला या आंदोलनात यश आले. त्यावेळी परिसरात लोकांची गर्दी होती. तर दादरच्या कबुतरखानाजवळील मशिदीत भोंग्याविना मुस्लीमबांधवांनी अजान अदा केल्याने मनसे कार्यकर्त्यांना आंदोलन करण्याची गरज भासली नाही. चारकोप येथे संजय नगरात अजान सुरु असताना मशिदीबाहेर मनसे कार्यकर्त्यांनी लाऊडस्पीकरवरुन हनुमान चालिसा पठण लावली. जोगेश्वरी येथील एस, व्ही, रोड येथील मशिदींत अजान झाल्यानंतर पोलिसांनी डिसेबल मोजला. माहिममधील मशिदीत पहाटे भोंग्याविना अजान अदा केली.

वांद्रे (पूर्व) बेहराम पाड्यासमोर आज दुपारी भोंग्यावर हनुमान चालिसा वाजविण्यासाठी जाणाऱ्या सहा मनसे पदाधिकाऱ्यांना खार निर्मलनगर पोलिसांनी रस्त्यातच ताब्यात घेतले. दुपारी १.४५ वाजता अजानची वेळ होती. या अगोदर मनसेने बेहराम पाड्यासमोर भोंग्याची व्यवस्था केली होती.

मुंबई पोलीस आयुक्त संजय पांडेंनी कायदा आणि सुव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी शहरात विविध ठिकाणी फिरले. नवी मुंबईच्या ऐरोली येथील जामा मशिदीजवळ हनुमान चालिसा पठण करण्यासाठी मनसे कार्यकर्ते पोहचले असता रबाळे पोलिसांनी मनसेच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. रबाळे पोलिसांनी रबालेसह आजूबाजूच्या परिसरातील सर्व मशिदींवर चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. मुंब्र्यातील कापुरबावडी येथे मशिदीवरील भोंगे मुस्लीमबांधवांनी स्वत: उतरवले. सर्वोच्च न्यायालयाच्या नियमाचे पालन करण्यात येईल, असे मशिदी प्रशासनाने सांगितले. पुणे शहरातील मनसैनिक भोंग्याविरोधात आक्रमक झाले होते. पुण्यातील खालकर चौकातील मनसे कार्यकर्त्यांनी महाआरती केली. त्यानंतर हे कार्यकर्ते कसबा पेठेतील प्राचीन पुण्येश्वर मंदिरात महाआरतीसाठी निघाले असताना पोलिसांनी मनसे पदाधिकाऱ्यांना ताब्यात घेतले. त्यावेळी कार्यकर्त्यांनी गोंधळ झाल्याने तेथे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पुण्याच्या आंबेगाव तालुक्यातील मंचर, घोडेगाव येथील मशिदीमध्ये प्रथमच भोंग्याविना अजान झाली. यावेळी मशिदीबाहेर पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला. तेथे सर्व धार्मिकस्थळांच्या परिसरात गुड मॉर्निंग पथक तैनात करण्यात आले आहे. नाशिकमधील सातपूर परिसरात भोंगा लावण्याच्या तयारीत असणाऱ्या मनसेच्या ६ कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. छपरीच्या तालीम परिसरातील श्री जबरेश्वर या छोट्या मंदिरासमोर हनुमान चालिसा लावून कार्यकर्त्यांनी धूम ठोकली. पोलिसांनी ॲम्प्लिफायरसह इतर साहित्य जप्त केले. नाशिक शहरातील सर्वच मशिदी बाहेर पोलिसांचा बंदोबस्त होता. सोलापूरच्या दत्ता चौकात सोन्या मारुती गणेश मंदिराजवळील मशिदीसमोर हनुमान चालिसा लावण्याचा प्रयत्न होताच कार्यकर्त्यांना पोलिसांनी अटक केली. त्यावेळी कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये शाब्दीक चकमक झाल्याने एकच गोंधळ झाला. धुळे शहरात भोंगे हातात घेवून हनुमान चालिसा पठन करण्यापुर्वी



कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. यावेळी या कार्यकर्त्यांनी राज्य सरकारचा निषेध करत निदर्शने केली. तेथे कार्यकर्त्यांना ताब्यात घेत असतांना पोलिसांत व कार्यकर्त्यांमध्ये झटापटी झाली. हिंगोली शहरातील सर्व मशिदीवरील भोंग्यांचा आवाज कमी करत अजान अदा केली. तर औरंगाबाद शहरातील सर्व मशिदींसमोर पोलीस बंदोबस्त ठेवला होता. तेथे कोणतीही अनुचित घटना घडली नाही. पोलिसांनी कोणत्याही मंदिरात पुजा अर्चाही थांबवली नाही. वाशिम शहरातील जामा मशिदीवर पहाटे सव्वापाच वाजता अजानवेळी मनसे कार्यकर्त्यांनी लाऊडस्पीकरवरून हनुमान चालिसा लावली. जळगाव शहरातील मसुराबाद रस्त्यावरील असलेल्या शनी मंदिरात पोलीस परवानगी घेऊन आरती करुन हनुमान चालिसा पठण केली. नागपुरातील जामा मशिदीत भोंग्याविना आजान अदा केली. त्यामुळे पोलिसांना बंदोबस्त लावण्याची वेळ आली नाही. तेथील मशिदीच्या भोंग्यांचा आवाज कमी करून अजान अदा केली. तसेच रत्नागिरीच्या दापोलीतील उद्यमनगरमधील मशिदीत भोंगा न लावता अजान अदा केली. कल्याणमध्ये कालरात्री २५ मनसे कार्यकर्त्यांना अटक केली होती. मात्र कल्याण परिसरातील मशिदीतील पहाटेची अजान भोंग्याविना पार पडली. कल्याण परिसरात मशिदीसमोर पोलीस तैनात होते.

**संदीप देशपांडे, संतोष धुरींनी पोलिसांच्या हातावर दिली तुरी**

आज मनसेचे नेते संदीप देशपांडे आणि संतोष धुरी हे राज ठाकरेंना भेटण्यासाठी शिवतीर्थावर आले होते. राज ठाकरेंची भेट घेल्यानंतर माध्यमांना प्रतिक्रिया देत असतानाच पोलीस त्यांना ताब्यात घेण्यासाठी आले. त्यावेळी एकच गोंधळ उडाला. आम्ही येतो असे सांगत देशपांडे आणि धुरी बाजूला झाले. त्याचवेळी पोलिसांना चकवा देत तिथे आलेल्या एका कारमध्ये बसून संदीप देशपांडे आणि संतोष धुरी वेगाने निघून गेले. त्यावेळी कारचा धक्का लागल्याने महिला पोलीस रस्त्यावर कोसळली. त्यात ही महिला पोलीस जखमी झाली. मनसे अध्यक्ष राज ठाकरे जखमी पोलीस महिलेची भेट घेणार आहेत.

**राज ठाकरेंकडून बाळासाहेबांचा जुना व्हिडिओ ट्वीट**

आज सकाळी ९ वाजता राज ठाकरेंनी मशिदीवरील भोंग्याबाबत आक्रमक भूमिका मांडतानाचा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंचा जुना व्हिडिओ ट्वीट केला. या व्हिडीओत बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते की, माझे सरकार महाराष्ट्रात आल्यावर रस्त्यावरील नमाज बंद करणार कारण उपद्रव होता कामा नये, मशिदीवरील लाऊडस्पीकर खाली उतरवले पाहिजेत. विकासाला आड येता कामा नये.

**जाहीर सुचना**

तमाम जनतेला याद्वारे सुचित करण्यात येते की, सदनिका क. १०५, पहिला मजला, हॅप्पी जीवन को. ऑप. हौ. सो. लि., सर्व्हे क. १०, ११, १२, मौजे नवघर, वसई रोड पश्चिम, ता. वसई, जि. पालघर, ४०१ २०२, या मिळकतीशी संबंधीत **मे. हॅप्पी होम बिल्डर्स** व **श्रीमती उषा भास्कर चव्हाण** यांच्यातील दिनांक ०४ जुन १९८२ रोजीचा मुळ करारनामा हरवला आहे. सदर दस्तऐवजाची मूळ प्रत कोणासही सापडल्यास आमच्या खालील पत्त्यावर ताबडतोब सुपूर्द करावे. जर कोणत्याही व्यक्तिला वा संस्थेला वर उल्लेखिलेल्या मालमत्तेसंबंधी वा त्याच्या हस्तांतराबाबत कोणताही हक्क, दावा आणि हितसंबंध असल्यास ते सुचना प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत पुष्टयर्थ कागदपत्रांसोबत आमच्या खाली उल्लेखिलेल्या पत्त्यावर लेखी स्वरुपात पाठवावे अन्यथा असे दावे त्यागित, अधित्यागित समजण्यात येईल

**पत्ता – श्री. पराग ज. पिंपळे,**
**वकील, मुंबई उच्च न्यायालय,**
एस/४, प्रविण पॅलेस, पंडित दिनदयाळ नगर, वसई रोड पश्चिम, ता. वसई, जि. पालघर
मो. ९८९००७९३५२ दिनांक : ०५.०५.२०२२

**जाहीर सूचना**

सदनिका क्र. ५०३, ५ वा मजला, रुणवाल ग्रॅण्ड सीएचएस लि., प्लॉट क्र. ६२, १८ वा रस्ता, चेंबूर, मुंबई ४०००७१ चे संयुक्त मालक **सौ. कल्पथी सुब्रमनियन मीनाक्षी आणि श्री. रामकृष्णन परशुराम** या माझ्या अशिलाच्या सूचनेअंतर्गत याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे. माझ्या अशिलांनी सांगितले आहे की, विकासक मे. रुणवाल बिल्डर्स प्रा. लि. यांनी दिलेले सदर सदनिकेच्या संदर्भातील मूळ ताबा पत्र, सदर विकासकांना पैसे प्रदान केल्याची मूळ भरणा पावती, आणि मूळ कार पार्किंग वाटप पत्र हरविले/गहाळ झाले/सापडत नाही. माझ्या अशिलांनी याबाबत चेंबूर पोलीस स्थानक अधिकाऱ्यांना त्यांच्या प्रमाणपत्र अ. क्र. ७२२, दि. ०२.०५.२०२२ नुसार सूचित केले आहे.

उपरोल्लेखित हरविलेल्या/गहाळ झालेल्या/सापडत नसलेल्या कागदपत्रामध्ये किंवा सदर सदनिकेवर कोणताही दावा असणाऱ्या सर्व व्यक्ती/प्राधिकाऱ्यांनी त्याबाबत जाहीर सूचनेच्या या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत माझ्या निम्न उल्लेखित कार्यालयात कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरुपात मला कळवावे. असे न केल्यास, त्यावर कोणताही दावा नाही असे मानण्यात येईल. या सूचनेपासून सदर १५ दिवसांच्या कालावधीनंतर प्राप्त झालेले कोणतेही दावे सोडून दिले आहेत असे मानण्यात येईल.

सही/-
**अभिषेक के. पारेख**
वकील, उच्च न्यायालय
दुकान क्र. १५ आणि १६, जनता मार्केट, चेंबूर रेल्वे स्टेशनजवळ, चेंबूर, मुंबई -४०० ०७१.

**नवी मुंबई महानगरपालिका**

**शहर अभियंता विभाग**

**निविदा सुचना क्रमांक - नमुंमपा/ श.अ./ 37 /2022-23**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम (रू.) |
| --- | --- | --- |
| 1 | ठाणे बेलापुर रस्त्यावरील घणसोली उडडाणपुलाची डांबरीकरणाने सुधारणा करणे. (76987) | 80,06,017/- |
| 2 | ठाणे बेलापुर रस्त्यावरील ऐरोली उडडाणपुलाची डांबरीकरणाने सुधारणा करणे. (76986) | 80,79,718/- |

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://nmmc.etenders.in या संकेतस्थळावर व www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर दि.05/05/2022 रोजी प्राप्त होतील.निविदेचे सादरीकरण https://nmmc.etenders.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.**

सही/-
**शहर अभियंता**
**जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/122/2022** **नवी मुंबई महानगरपालिका**

# दोन आठवड्यात सर्व निवडणुका जाहीर करा

पान १ वरून

झाल्यानंतर निवडणुका पुढे ढकलण्यासाठी राज्य सरकारने निवडणूक आयोगाचे काही अधिकार स्वतःकडे घेण्याचा कायदा केला. या कायद्याने प्रभाग रचना आणि निवडणुकीच्या तारखा ठरवण्याचे अधिकार राज्य सरकारने स्वतःकडे घेतले आहेत. राज्य सरकारच्या या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते, त्या याचिकेवर २५ एप्रिल रोजी सुनावणी झाली होती. यासंदर्भातला अंतिम निकाल आज सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणूक होऊ देणार नाही, असे सांगत विरोधी पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेण्यास विरोध केला होता. तर राज्य सरकारने ओबीसी आरक्षण लागू होत नाही तोपर्यंत निवडणुका घेणार नाही अशी भूमिका घेतली होती. आजच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर माध्यमांशी बोलताना विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पाच वर्षे पूर्ण झाल्यावर सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ प्रशासक ठेवता येत नाही, अशा ठिकाणी निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. हे सरकारचे अपयश आहे. या निर्णयामुळे ओबीसींची अपरिमित हानी होणार आहे. त्याला सरकारच जबाबदार आहे. सरकारने कधीही योग्य कार्यवाही केली नाही, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. दरम्यान, महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी न्यायालयाच्या निर्णयानंतर प्रतिक्रिया देताना म्हणाले की, ओबीसींना आरक्षण मिळेपर्यंत निवडणुका नको असा निर्णय मुख्यमंत्र्यांनी सर्वपक्षीय नेत्यांच्या बैठकीत घेतला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर काय कार्यवाही करायची याचा अधिकार राज्य निवडणूक आयोगाला आहे. न्यायालयाकडून सविस्तर निर्णय पत्र मिळायचे आहे. ते मिळाल्यावर यावर बोलता येईल. आता निवडणुका लागल्या तर मविआ सरकार तयार आहे. मविआ सरकारच पूर्ण ताकतीने निवडणूक लढवेल. 'भाजपाला सत्तेपासून दूर ठेवणे' हाच आमचा नारा असेल, असे देखील बाळासाहेब थोरात म्हणाले.

**महाराष्ट्र शासन**
**सा. बां.(आदिवासी) विभाग, ठाणे**
**संक्षिप्त ई-निविदा सुचना क्रमांक-३ सन २०२२-२३**

कार्यकारी अभियंता, सा.बां.(आदिवासी) विभाग, ठाणे दुरध्वनी क्र.०२२-२५४१००४६ हे ई-निविदाव्दारे (ऑनलाईन) खालील कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील **आदिवासी विकास विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदार** यांचेकडून मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत किंमत (रु.लक्ष) | कंत्राटदाराचा वर्ग |
| --- | --- | --- | --- |
| १ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा कोठारे ता.शहापूर जि.ठाणे येथे मुलींसाठी वसतीगृहाचे बांधकाम करणे. | रु.५,२६,००,६६७/- | वर्ग-२ व त्यावरील |

- निविदा डाऊनलोड करण्याचा **दिनांक** ०५/०५/२०२२ **रोजी ते दि.**१९/०५/२०२२ **वेळ** १०.३० **ते** १७.३० पर्यंत आहे.
- निविदा **पूर्व बैठक दि.**१३/०५/२०२२ **रोजी** १२.०० **वाजता** मा.मुख्य अभियंता, बांधकाम भवन कक्ष, आदिवासी विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांचे कार्यालयात (शक्य झाल्यास) किंवा ऑनलाईन.
- ई-निविदा उघडण्याचा **दिनांक**- २३/०५/२०२२ **वेळ** १२.३० (शक्य झाल्यास)
- सर्व पात्र/ इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या http://mahatenders.gov.in या पोर्टलवर enrolled करणे आवश्यक आहे.

जा.क्र.साबां (आ)विठा/ठाणे/निविदा/क्रं.०३/८४९
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.(आदिवासी) विभाग, ठाणे
सा.बां. आवार, स्टेशनरोड, ठाणे-४०० ६०१.
ईमेल पत्ता :- eepwdtribalthane@gmail.com
दुरध्वनी क्रमांक :- ०२२-२५४१००४६
दिनांक :- २९/०४/२०२२
क्रमांक : आरओसी-२०२२-२३/क्र-५/सी ४४३

सही/-
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां.(आदिवासी) विभाग, ठाणे**

सिडको
शहरांचे शिल्पकार

**बोली मागविणारी सूचना**

**कळंबोली, नवी मुंबई येथे सेक्टर-१२मध्ये ५० एमएलडी क्षमतेच्या मलनिःसारण प्रक्रिया संयंत्र येथे किरकोळ विद्युत दुरुस्त्या**

महाराष्ट्राची सिडको मर्यादीत खाली नमूद केलेल्या कामाकरिता सिडको मर्या. कडे वर्ग 'ए' मध्ये किंवा केंद्र शासन, किंवा महाराष्ट्र राज्य शासन आणि त्यांच्या उपक्रमांमध्ये विद्युत नोंदणीकरणाच्या उचित वर्गामध्ये नोंदणीकृत असलेल्या, अनिवार्य पात्रता निकष पूर्ण करीत असलेल्या, ज्यांनी **एसटीपी आणि मलनिःसारण पंप हाऊस स्थापनेच्या मलनिःसारण पंप आणि एसटीपीच्या पॅनेल्स इ.ची दुरुस्ती आणि देखभाल** यांसारखी तत्सम स्वरुपाची कामे पूर्ण केली आहेत अशा परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ई-निविदा प्रक्रियेद्वारे "**ऑनलाईन**" बाब दर शतमान निविदा मागवित आहेत.

**१) कामाचे नाव : कळंबोली, नवी मुंबई येथे सेक्टर-१२मध्ये ५० एमएलडी क्षमतेच्या मलनिःसारण प्रक्रिया संयंत्र येथे किरकोळ विद्युत दुरुस्त्या. २) सी. ए. क्र.:** ०८/सिडको/ईई(केएलएम)/२०२१-२२. **३) बोलीस लावण्यात आलेली किंमत:** रु. २९,६१,४६६.००/- **४. ई.एम.डी.:** रु. २९,७००/- **५. नोंदणीकरण वर्ग:** 'ए' वर्ग (विद्युत कामे) **६. पूर्तता कालावधी:** ६० (साठ) दिवस (पावसाळा समाविष्ट) **७. निविदा प्रक्रिया शुल्क:** रु. १,१८०.०० (रुपये एक हजार एकशे ऐंशी मात्र) (ना-परतावा) (१८% जीएसटी समाविष्ट) (रु. १०००/- बोली किंमत + १८% जीएसटीकरिता रु. १८०/-).

निविदा कार्यक्रमासह निविदा प्रपत्रे दि. ०६.०५.२०२२ रोजी १७.०१ वाजेपासून वेबसाईट https://mahatenders.gov.in वर उपलब्ध होईल.

**कार्यकारी अभियंता**
**(केएलएम)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०५८/२०२२-२३

नवा काळ

मुंबई ■ गुरुवार ५ मे, २०२२ ■ पान- ८

# आयपीएल अंतिम सामन्याचा थरार अहमदाबादच्या स्टेडियमवर



**मुंबई-** आयपीएलच्या १५ व्या हंगामातील अंतिम आणि उपांत्य फेरीतील सामने अहमदाबाद आणि कोलकाता येथे खेळवले जाणार आहेत. या स्पर्धेतील अंतिम सामना २९ मे रोजी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे, अशी माहिती बीसीसीआयचे सचिव जय शहा यांनी दिली. म्हणजे आयपीएलचा अंतिम थरार नरेंद्र मोदी स्टेडियमवर रंगणार आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर २७ मे रोजी पात्रता फेरीचा सामना होणार आहे. कोलकाता येथील ईडन गार्डन मैदानावर २४ आणि २५ मे रोजी क्वालिफाय आणि एलिमिनेटर सामने होणार आहेत. १५ व्या हंगामासाठी आयपीएल सामन्यांचे वेळापत्रक ६ मार्चला जाहीर झाले होते. ७० सामन्यांच्या या मालिकेतील उपांत्य आणि अंतिम सामने कोठे खेळवले जाणार याविषयी ठरवण्यात आले नव्हते. मात्र आता हे सामने अहमदाबाद आणि कोलकात्यात होणार आहेत. अंतिम सामना नरेंद्र मोदी स्टेडियमवर अहमदाबादमध्ये होणार आहे.

## दाऊद इब्राहिमच्या पुतण्याला दणका जामीन देण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार

■ नवी दिल्ली

**अंडरवर्ल्ड** डॉन दाऊद इब्राहिम याचा पुतण्या मोहम्मद रिझवान इक्बाल कासकर याला जामीन देण्यास सुप्रीम कोर्टाने नकार दिला आहे. बांधकाम व्यावसायिकाला धमकी दिल्याचा गंभीर आरोप मोहम्मद कासकर याच्याविरोधात आहे. २०१९ सालच्या संबंधित धमकीप्रकरणी पोलिसांनी कासकरला महाराष्ट्र संघटित गुन्हे नियंत्रण कायद्याअंतर्गत अटक केली होती. कासकर याच्याविरोधात लवकरात लवकर आरोपांची निश्चिती केली जावी, असे निर्देशही न्यायमूर्ती एम. आर. शहा आणि न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांच्या खंडपीठाने आज बुधवारी झालेल्या सुनावणीवेळी दिले. जामिनासाठी कासकर नव्याने अर्ज करु शकतो, असे न्यायालयाने नमूद केले आहे.



मुंबई हायकोर्टाने २०२१ साली कासकर याला जामीन देण्यास विरोध केला होता. त्यानंतर कासकर याने सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती. सध्याच्या परिस्थितीत कासकर याला जामीन देण्याचे काही कारण दिसून येत नाही. तपास पूर्ण झाला असून, आरोपपत्र दाखल झालेले आहे. अशा स्थितीत पुढील सहा महिन्यांच्या कालावधीत संबंधित न्यायालयाने कासकर याच्याविरोधात आरोप निश्चिती करावी, असे सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले आहे. कासकरला जुलै २०१९ मध्ये अटक करण्यात आली होती. तर १० ऑक्टोबर २०१९ रोजी पोलिसांनी मोक्का कायद्याअंतर्गत त्याच्यावर आरोपपत्र दाखल केले होते. तक्रारदार बांधकाम व्यवसायिक इलेक्ट्रॉनिक वस्तूंची आयात देखील करतो. या व्यापारातल्या भागीदाराकडून त्याचे १५ लाख रुपयांचे येणे होते.

## अनिल देशमुखांची सुनावणी सत्र न्यायालयाने पुढे ढकलली

■ मुंबई

**शंभर** कोटी वसुली प्रकरणी तुरुंगात असलेले माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचाराकरीता परवानगी मागवण्यात आली होती. मात्र जेजे रुग्णालयातील अहवाल आज मुंबई सत्र न्यायालयात आला नसल्याने त्यांच्या अर्जावर आज होणारी सुनावणी पुढे ढकलण्यात आली. अनिल देशमुखांच्या वतीने घरचे जेवण मिळावे म्हणून कोर्टाकडे अर्ज करण्यात आला आहे. यावर ९ मे रोजी सुनावणी होणार आहे. अनिल देशमुख यांनी मुंबई सत्र न्यायालयातील विशेष कोर्टात खांदेदुखीवर शस्त्रक्रिया करण्याकरीता खाजगी रुग्णालयात उपचाराकरीता परवानगी मागितली होती. मात्र आज जेजे रुग्णालयातील अहवाल आला नसल्यामुळे सुनावणी टाळण्याचा निर्णय सत्र न्यायालयाने दिला आहे. मागील सुनावणीदरम्यान अनिल देशमुख यांच्याकडून कोर्टात सांगण्यात आले की, जे.जे. रुग्णालयात उपचारासाठी सुविधा अपुऱ्या आहेत. खाजगी रुग्णालयात उपचारासाठी अनिल देशमुख यांनी कोर्टाकडून परवानगी मागितली होती. जे जे रुग्णालयाकडून यावर अहवाल आल्यावर निर्णय घेऊ असे कोर्टाने म्हटले होते.

## पुण्यात २२२ मशिदी, ९६ मंदिरांच्या लाऊडस्पीकरला पोलिसांची परवानगी

■ पुणे



**मशिदींवरील** भोंग्यावरून राज्याचे राजकारण तापले असताना पुणे ग्रामीण पोलिसांनी २२२ मशिदी आणि ९६ मंदिरांना लाऊडस्पीकरची परवानगी दिली. मात्र त्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्याची सक्त सूचना दिली आहे.

मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मशिदींवरील भोंगे हटवण्याची मागणी केल्यानंतर आणि त्यासाठी सरकारला अल्टिमेटम दिल्यानंतर पुणे जिल्ह्यातील २२६ मशिदींनी लाऊडस्पीकरसाठी पोलिसांकडे रीतसर परवानगी मागितली. याशिवाय ९९ मंदिरांनीही लाऊडस्पीकरच्या परवानगीसाठी पोलिसांकडे अर्ज केले. त्यानंतर ग्रामीण पोलिसांनी २२२ मशिदी आणि ९६ मंदिरांवरील लाऊडस्पीकरला परवानगी दिली. मात्र त्यांनी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे काटेकोर पालन केले पाहिजे, अशी सूचना दिली आहे. नागरिकांनी सामाजिक व धार्मिक सद्भावना जोपासावी. कोणीही नियमाचे आणि कायद्याचे उल्लंघन करू नये, असे आवाहन पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांनी केले आहे.

## महेला जयवर्धनेने निवडले ड्रीम टी-२० चे पहिले ५ खेळाडू

**भारतीय खेळाडूला दिले संघात स्थान**

■ नवी दिल्ली

**श्रीलंका** संघाचा माजी कर्णधार आणि मुंबई इंडियन्सचे प्रशिक्षक महेला जयवर्धनेने त्याच्या ड्रीम टी-२० इलेव्हेन मधील पहिले पाच खेळाडू निवडले आहेत. या संघात स्थान मिळवणारा जसप्रीत बुमराह हा एकमेव भारतीय खेळाडू आहे. तर एक अफगाणिस्तान,एक इंग्लंड आणि दोन पाकिस्तानी खेळाडूंचा समावेश आहे. महेला जयवर्धने म्हणाला की, जसप्रीत बुमराह विकेट घेण्यासोबतच शेवटच्या षटकात धावा रोखणाराही प्रभावी गोलंदाज आहे. त्याचबरोबर राशिद खान, शाहीन शाह आफ्रिदी, जोस बटलर आणि मोहम्मद रिझवान यांचाही या यादीत समावेश आहे. महेला जयवर्धने याने आपले टिमविषयीचे मत स्पष्ट करताना, जसप्रीत बुमराहकडे सामन्याच्या कोणत्याही षटकात विकेट घेण्याची क्षमता आहे. जेव्हा तुम्हाला विकेट्सची गरज असते, त्यावेळी तुम्हाला जसप्रीत बुमराहसारखा गोलंदाज हवा असतो, म्हणून बुमराह हा या संघासाठी महत्त्वाचा असेल. असे जयवर्धने यांनी म्हटले आहे.

## मुंबई मेट्रोच्या टप्पा २ए आणि ७ ला प्रवाशांचा अल्प प्रतिसाद

■ मुंबई

**मुंबई** मेट्रो प्रकल्पातील २ए आणि ७ हे मेट्रो मार्ग २ एप्रिलपासून सुरु झाले. मात्र त्यांना प्रवाशांचा अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. या मार्गांवर रोज सरासरी २९ हजार प्रवासी प्रवास करतात. या मेट्रोची रोजची प्रवासी क्षमता ३ लाख आहे.

मेट्रोच्या उद्घाटनानंतर ३ एप्रिलला सर्वाधिक म्हणजे ५६ हजार ७०४ प्रवाशांनी एका दिवसात मेट्रोचा प्रवास केला होता. त्यानंतर केवळ रविवारी या मार्गावर प्रवासी संख्या वाढत असल्याचे आढळते. एमएमआरडीएने २ एप्रिलपासून २ए आणि ७ हा मेट्रोचा टप्पा सुरू केला. लाइन-१ आरे



स्टेशन ते वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे आणि डहाणूकरवाडी स्टेशन दरम्यान लाईन २ए व्हाया दहिसर असा हा मेट्रो मार्ग आहे. त्यावर आत्तापर्यंत ८ लाख ८३ हजार प्रवाशांनी प्रवास केला आहे. म्हणजे दररोज सरासरी २९ हजार प्रवाशांनी प्रवास केला. या मेट्रोची रोजची प्रवासी क्षमता ३ लाख आहे. असे असताना ३ एप्रिलला या मेट्रोतून ५६ हजार ७०४ प्रवाशांनी प्रवास केला. दोन रविवारी अनुक्रमे ४८ हजार २८३ आणि ४० हजार ६५४ प्रवाशांनी मेट्रोने प्रवास केला. २४ एप्रिलला या मेट्रोतून ३६ हजार ४६३ आणि १ मे रोजी ३२ हजार ४३३ प्रवाशांनी प्रवास केला. मेट्रो-७ अंधेरी पूर्व स्टेशनला जोडल्यानंतर या मार्गावरील प्रवासी संख्या वाढेल, असे मत काहींनी व्यक्त केले आहे.

## 'जब हैं भूखे पेट, तो क्या करेगा नेट' मोदींच्या वक्तव्यावर यादवांचे ट्विट

■ नवी दिल्ली

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी हे सध्या बर्लिनच्या दौऱ्यावर आहेत. तिथे मोदींनी दावा केला की, भारतात इंटरनेट कनेक्टिव्हिटी खूप वेगवान आहे. तसेच स्वस्त दरात इंटरनेट सेवा दिली जात आहे. यावर समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी,'विदेशों में ताली बजवाना और देश में थाली सजवाना दो अलग बातें हैं'! 'जब हैं भूखे पेट, तो क्या करेगा नेट' असे ट्विट करत मोदींवर निशाणा साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या बर्लिनच्या दौऱ्यावर आहेत. बर्लिनमध्ये भारतीयांना संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी दावा केला की, भारतात इंटरनेट कनेक्टिव्हिटी खूप वेगवान आहे. तसेच स्वस्त दरात इंटरनेट सेवा दिली जात असल्याचेही मोदी म्हणाले होते. तसेच भारत आता वेगाने प्रगती करत आहे. आता देश बदलला आहे.



जिथे जाल तिथे काम चालू आहे. बर्लिनमधील भाषणादरम्यान मोठ्या संख्येने भारतीय त्याठिकाणी जमा झाले होते. यावेळी लोकांनी 'भारत माता की जय' आणि 'मोदी है तो मुमकिन है'च्या घोषणाही दिल्या जात होत्या. मात्र अखिलेश यादव यांनी स्वस्त इंटरनेट डेटा देण्याच्या पंतप्रधान मोदींच्या या वक्तव्याची खिल्ली उडवली आहे. ते म्हणाले, पेट्रोल, डिझेल, गॅस, डाळी, तांदूळ, तेल हे स्वस्त करा, केवळ डेटाने पोट भरत नाही. कारण 'जब हैं भूखे पेट, तो क्या करेगा नेट' असा सवाल अखिलेश यादव यांनी ट्विट करत उपस्थित केला आहे.

## मध्य प्रदेशच्या सिवनीत २ आदिवासींचा मारहाणीत मृत्यू! गोमांस विक्रीचा संशय

■ सिवनी

**मध्य** प्रदेशच्या सिवानीत मॉब लिचिंगचा धक्कादायक प्रकार पुन्हा उघडकीस आला. गोमांस विक्रीच्या संशयावरून जमावाने ३ आदिवासींना लाठ्या-काठ्यांनी जबर मारहाण केली. मंगळवारी घडलेल्या या प्रकारात २ आदिवासींचा जागीच मृत्यू झाला. अन्य एक जण जबर जखमी झाला आहे. या घटनेनंतर संतापलेल्या आदिवासींनी जबलपूर-नागपूर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. हा प्रकार कुरई पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला. बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी या आदिवासींना मारहाण केल्याचा आरोप त्यांच्या नातेवाईकांनी केला आहे. यामुळे परिसरात तणाव पसरला आहे.

मध्य प्रदेशातील

**एक तरुण जबर जखमी**

सिवानीजवळच्या सुरई गावातील ३ आदिवासींना जमावाने गोमांस तस्करीच्या संशयावरून जमावाने बेदम मारहाण केली. त्यात २ जणांचा जागीच मृत्यू झाला. एक तरुण जबर जखमी झाला आहे. त्यानंतर येथील आदिवासींनी जबलपूर-नागपूर महामार्गावर रास्ता रोको केला. बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांच्या मारहाणीत या आदिवासींचा मृत्यू झाल्याचा आरोप त्यांच्या नातेवाईकांनी केला. या घटनेची माहिती मिळताच बारघाटचे काँग्रेस आमदार अर्जुनसिंह काकोडिया घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आदिवासींसोबत रास्ता रोको आंदोलनात भाग घेतला. यातील आरोपींना अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळी १२ किलो मांस जप्त केले आहे. ते फॉरेन्सिक तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले आहे. त्यानंतर हे मांस कशाचे आहे ते स्पष्ट होईल. या प्रकरणावरून काँग्रेसने शिवराज सिंग चौहान यांना लक्ष्य केले असून मध्य प्रदेशात जंगल राज सुरू असल्याचा आरोप केला आहे.

## कोरेगाव-भीमा प्रकरणात संभाजी भिडेंचा सहभाग नाही

■ मुंबई

**भीमा** कोरेगाव हिंसाचार प्रकरणात शिव प्रतिष्ठानचे प्रमुख संभाजी भिडे यांचा सहभाग नसल्याचे पुणे पोलिसांनी म्हटले आहे. यासंदर्भात यापूर्वीच भिडेंना क्लीनचीट मिळाली होती. आता दोषारोपपत्रातूनही त्यांचे नाव वगळण्यात आले आहे. याबाबतचे पत्रही पुणे पोलिसांनी मानवी हक्क आयोगाला दिले आहे. पुणे जिल्ह्यातील कोरोगाव भीमा इथे झालेल्या हिंसाचारप्रकरणी शिवप्रतिष्ठानचे संभाजी भिडे यांच्याविरोधात सन २०१८ मध्ये गुन्हा दाखल झाला होता. पण तपासादरम्यान संभाजी भिडे यांचा कोरोगाव भीमा हिंसाचार प्रकरणात सहभाग आढळला नसल्याचे पोलिसांनी कोर्टात सांगितले आहे. तसेच ही माहिती राज्य मानवी हक्क आयोगालाही पुणे ग्रामीण पोलिसांकडून देण्यात आली आहे. यासंदर्भात ठाण्यातील एका व्यक्तीने पुणे पोलीस अधीक्षकांकडून माहिती मागवली होती. या माहितीला उत्तर देताना पोलिसांनी ही माहिती दिली आहे. त्यानुसार, पोलिसांनी कोरेगाव भीमा हिसांचारात संभाजी भिडेंचा सहभाग असल्याचे आढळून आलेले नसल्याचे कोर्टातही सांगितले आहे. आता संभाजी भिडेंचे नाव वगळता इतर जे ४२ आरोपी आहेत त्यांच्यावर मात्र पोलिसांनी दोषारोप पत्र दाखल केले आहे.

## व्हिएतनामच्या डोंगरमाथ्यावरील काचेचा पूल नागरिकांसाठी खुला



■ हनोई

**गेल्या** २ वर्षात कोरोना महामारी आणि लॉकडाऊनमुळे शेकडो देशांना प्रचंड आर्थिक नुकसान सहन करावे लागले. आता मात्र हे नुकसान भरून काढण्याचे जोरदार प्रयत्न प्रत्येक देशाकडून सुरू आहेत. त्यासाठी आपापला पर्यटन व्यवसाय अधिक खुलविण्याकडे अनेक देशांचा कल आहे. आता व्हिएतनाममध्ये तर चक्क डोंगरमाथ्यावर काचेचा पूल बांधण्यात आला आहे. काचेच्या फरशीमुळे पर्यटकांना या पुलावरून चालताना सभोवतालचे सौंदर्य अगदी सहज पाहता येईल. त्यामुळे तो जगाचे आकर्षण बनणार हे नक्की. 'बाख लाँग पादचारी पूल' असे याचे नाव आहे. ज्याचा इंग्रजी अर्थ 'व्हाईट ड्रॅगन ब्रिज' असा होतो. पूल बांधणाऱ्यांनी हा जगातील सर्वात लांब काचेचा पूल असल्याचा दावा केला आहे, मात्र गिनीज वर्ल्ड रेकॉर्डने याबाबत आतापर्यंततरी काहीही म्हटलेले नाही. अलीकडेच हा पूल नागरिकांसाठी खुला करण्यात आला.

व्हिएतनामच्या उत्तर पश्चिमी सोन ला प्रांतात असलेल्या या पुलाचा मजला खास टेम्पर्ड ग्लासचा असून तो फ्रेंच निर्मित आहे. एकावेळी ४५० लोक चालू शकतात, इतका तो मजबूत आहे. त्याची लांबी ६३२ मीटर लांब म्हणजेच सुमारे २,०७३ फूट इतकी असून उंची १५० मीटर म्हणजेच ४९२ फूट इतकी आहे. या पुलामुळे व्हिएतनामच्या सौंदर्यात आणखी भर पडली यात काही शंका नाही, मात्र विशेष म्हणजे हा जगातील पहिलाच काचेचा पूल नाही. तर व्हिएतनाममधील हा तिसरा काचेचा पूल असून चीनच्या गुआंगडॉन्गमध्ये ५२६ मीटर लांबीचा काचेच्या तळाचा पूल आहे. याशिवाय काही वर्षांपूर्वी पोर्तुगालमध्ये १६०० फूट उंचीवरचा काचेच्या तळाचा पूलही खुला करण्यात आला होता.

## बंगळुरुची १७३ धावांची खेळी चेन्नईसमोर १७४ धावांचे लक्ष्य

■ पुणे

**महाराष्ट्र** क्रिकेट असोसिएशन मैदानावर आज चेन्नई सुपर किंग्ज विरुध्द रॉयल चॅलेंज बंगळुरु यांच्यात सामना रंगला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या बंगळुरु संघाने चेन्नईसमोर १७४ धावांचे आव्हानात्मक

**डुप्लेसिसला मोईन अलीने ३८ धावांवर बाद केले....**

लक्ष्य ठेवले आहे. बंगळुरुकडून कोहली, फाफ डु प्लेसिस यांनी उत्तम सुरुवात केल्यानंतर माहिपाल लोमरोरने केलेल्या तुफान खेळीनंतर आणि दिनेश कार्तिकच्या फटकेबाजीमुळे ही धावसंख्या उभी राहिली.

चेन्नईकडून महेश तीक्ष्णाने उत्तम गोलंदाजी करत तीन गडी बाद केले. चेन्नईने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कर्णधार फाफ डु प्लेसिस आणि विराट कोहलीने बंगळुरुच्या डावाची सुरुवात केली. दोघांनी ७२ धावांची भागिदारी केली. कर्णधार डु प्लेसिसला मोईन अलीने ३८ धावांवर बाद केले. कोहली आणि मॅक्सवेल ही जोडी मैदानात होती. मात्र मॅक्सवेलही जास्त काळ मैदानावर तग धरु शकला नाही. उथप्पाने त्याला ३ धावसंख्येवर धावबाद केले. त्यापाठोपाठ विराट कोहलीला मोईन अलीने ३० धावांवर बाद केले. १० षटकांत बंगळुरुने ३ गडी गमावत ७९ धावा केल्या होत्या. त्यानंतर लोमरोर आणि पाटीदार यांनी बंगळुरुला सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र पाटीदार २१ धावांवर प्रेटोरीयसचा बळी ठरला. बंगळुरुने २० षटकांत ८ गडी गमावत १७३ धावा केल्या.

## नाराज हार्दिक पटेलांना राहुल गांधींचा संदेश गुजरातमधील काँग्रेसचा वाद मिटण्याची चिन्हे

■ नवी दिल्ली

**गेल्या** वर्षभरात काँग्रेसमध्ये गटबाजी सुरु आहे. त्यात हार्दिक पटेल नाराज असल्याची चर्चाही होत आहे. याच पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकीपूर्वी पक्ष युनिटमधील मतभेद दूर करण्यासाठी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गुजरात काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष हार्दिक पटेल यांना मेसेज केला असून, त्यांच्याशी चर्चा केली असल्याची माहिती समोर आली आहे.

पक्षाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुल गांधी यांनी हार्दिक पटेल यांना पक्षात राहण्याचा संदेशही पाठवला आहे. तसेच पक्ष प्रभारी आणि इतर नेत्यांनाही पक्षातील मतभेद दूर करण्यासाठी हार्दिकशी संपर्क साधण्यास सांगितले आहे. त्याचवेळी काँग्रेसचे सरचिटणीस रणदीप सुरजेवाला यांनीही पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वाने हार्दिकशी



बोलल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. यादरम्यान रणदीप सुरजेवाला म्हणाले की, पक्षाने हार्दिकशी जे काही बोलले आहे त्याची संपूर्ण माहिती फक्त गुजरातचे प्रभारी रघु शर्माच देऊ शकतात. काँग्रेसच्या गुजरात युनिटला नेतृत्व महत्त्व देत नसल्यामुळे हार्दिक नाराज आहे. दरम्यान, त्यांनी त्यांच्या ट्विटर बायोमधून काँग्रेस पक्षाचे नाव हटवले. मात्र हार्दिक पटेल यांनी पक्ष सोडल्यास ते काँग्रेससाठी हानिकारक असेल, असे काँग्रेसच्या एका वरिष्ठ नेत्याने सांगितले आहे. तसेच हार्दिक यांच्या नाराजी दरम्यान, ते भाजपमध्ये प्रवेश करतील अशीही चर्चा होती. मात्र यावर आपल्या नाराजीबाबत स्पष्टीकरण देताना हार्दिक पटेल म्हणाले की, आपण काही काळापासून काँग्रेसमध्ये आहोत.

आपण काँग्रेसमध्येच राहावे, यासाठी केंद्रीय पक्षश्रेष्ठी काहीतरी मार्ग काढतील. परंतु आपण पक्ष सोडावा, अशी काहीजणांची इच्छा आहे. त्यांचे आपले मनोबल खच्ची करायचे आहे. मी राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्यावर नाही तर गुजरातच्या काँग्रेस कमिटीवर नाराज आहे.

## एक्स्प्रेस-वेवर ट्रक कोसळून २ जखमी

■ लोणावळा

**मुंबई-पुणे** एक्सप्रेस वेवरून मुंबईकडे जाणारा ट्रक आज सकाळी खंडाळा घाटातील खोपोली एक्झिटजवळच्या उतारावरील पुलावरून दरीत कोसळून अपघात झाला. त्यात २ जण जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पुण्याहून मुंबईकडे जाणारा ट्रक आज सकाळी ७.३० च्या सुमारास खंडाळा घाटातील खोपोली एक्झिटजवळ आला तेव्हा तेथील पुलावरून तो दरीत कोसळून अपघात झाला. चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात झाला. त्यात ट्रकमधील २ जण जबर जखमी झाले.त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

## केम्पे गौडाचा १०८ फुटी पुतळा हातात ४ हजार किलोची तलवार



■ बंगळुरू

**कर्नाटकची** राजधानी बंगळुरूचे संस्थापक केम्पे गौडा यांचा बंगळुरू आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात १०८ फूट उंच भव्य पुतळा उभारला जात आहे. पुतळ्याच्या हातात ४ हजार किलो वजनाची तलवार बसवली जात आहे.

२३ एकर जमिनीवरील पार्कमध्ये हा ऐतिहासिक पुतळा बसवला जात आहे. ३५ फूट लांबीची ही तलवार बंगळुरूत दाखल झाली. त्याबद्दल राज्याचे उच्च शिक्षण मंत्री अश्वथ नारायण यांनी आनंद व्यक्त केला. बंगळुरू आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरात केम्पे गौडा यांचा १०८ फूट उंच भव्य पुतळा उभारला जात आहे. या पुतळ्याच्या हातात ३५ फूट लांबीची ४ हजार किलोची तलवार बसवली जाणार आहे. ही तलवार दिल्ली येथून खास ट्रकने बंगळुरूत आणली. तिची पुजाऱ्यांनी विधिवत पूजा केली. या कार्यक्रमाला राज्याचे उच्चशिक्षण मंत्री नारायण उपस्थित होते. राम सुतार पुतळ्याचे शिल्पकार आहेत. वल्लभभाई पटेल यांच्या भव्य पुतळ्याबरोबरच त्यांनी बंगळुरू विधानसभेतील महात्मा गांधीजींच्या भव्य पुतळ्याची रचना केली आहे. केम्पे गौडांचा हा पुतळा पर्यटकांचे आकर्षण बनेल, असे त्यांनी सांगितले.